**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २०/०२/२०१५

**मा. सर्वसाधारण सभा इतिवृत्तांत**
**सभा क्रमांक ३२ दिनांक २०/०२/२०१५**
**सभा सूचना क्रमांक १० दिनांक ११/०२/२०१५**
**सभा क्रमांक ०१ दिनांक २०/०२/२०१५**

ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २०/०२/२०१५ रोजी सकाळी ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या " भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक १० दिनांक ११/०२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्याकरिता आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. महापौर श्री. संजय भाऊराव मोरे हे उपस्थित होते.

**१) श्री. संजय भाऊराव मोरे - महापौर**
**२) श्री. राजेंद्र रमेश साप्ते - उप महापौर**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | नरेश रतन मणेरा | ४ | मढवी बिंदू महेंद्र |
| ५ | डुंबरे मनोहर जयसिंग | ६ | मुकेश मधुकर मोकाशी |
| ७ | उज्वला रामचंद्र फडतरे | ८ | मिनाक्षी राजेंद्र शिंदे |
| ९ | मधुकर रामचंद्र पावशे | १० | उषा संजय भोईर |
| ११ | भोईर संजय देवराम | १२ | आशादेवी शेरबहादूर सिंह |
| १३ | हरिश्चंद्र श्रीपत पाटील | १४ | चव्हाण तेजस्विनी किरण |
| १५ | वाव्हळ सुभाष सिताराम | १६ | संभाजी धोंडिराम पंडीत |
| १७ | प्राजक्ता प्रदिप खाडे | १८ | विलास चंदू कांबळे |
| १९ | सुशिला संकटाप्रसाद यादव | २० | राधा फत्तेबहादूर सिंह |
| २१ | राजकुमार रामनयन यादव | २२ | चिंदरकर कांचन विजय |
| २३ | सरैय्या अमित जयसिंग | २४ | जाधवर राधाबाई सुभाष |
| २५ | जगदाळे हनुमंत ज्ञानु | २६ | पाटील वर्षा वसंत |
| २७ | पालांडे दशरथ बाबुराव | २८ | सरनाईक परिषा प्रताप |
| २९ | सरनाईक विहंग प्रताप | ३० | भोईर विमल अर्जुन |

ठाणे महानगरपालिका ठाणे

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | चव्हाण विक्रांत भिमसेन | ३२ | पाटील कल्पना हरिश्चंद्र |
| ३३ | डिसोजा लॉरेन्स साल्वाडोर | ३४ | पाटील शारदा विजय |
| ३५ | लासे विजया मनोज | ३६ | गौरी अनिता सुनील |
| ३७ | पाटील उमेश काशिनाथ | ३८ | पाटील रत्नप्रभा लक्ष्मण |
| ३९ | देसाई सुहास सुर्यकांत | ४० | महेश्वरी संजय तरे |
| ४१ | मिलिंद माधव पाटणकर | ४२ | एगडे रामचंद्र हरी |
| ४३ | नंदिनी राजन विचारे | ४४ | मंदार प्रमोद विचारे |
| ४५ | वडवले संतोष वसंत | ४६ | कणसे निर्मला शरद |
| ४७ | बोरीटकर प्रभा अशोक | ४८ | तायडे रामभाऊ महादेव |
| ४९ | भोईर एकता एकनाथ | ५० | आशा बाबासाहेब कांबळे |
| ५१ | जितेंद्र प्रभाकर वाघ | ५२ | शान मनप्रीत गुरमकसिंग |
| ५३ | शिंदे मनोज तुकाराम | ५४ | संगिता माणिक पाटील |
| ५५ | काशिराम गोविंद राऊत | ५६ | घाडीगांवकर संजय पांडुरंग |
| ५७ | मोरे संध्या सुनिल | ५८ | खताळ विशाखा मधुकर |
| ५९ | जानकर योगेश तातोबा | ६० | फाटक जयश्री रविंद्र |
| ६१ | फाटक रविंद्र सदानंद | ६२ | जगताप अश्विनी अशोक |
| ६३ | म्हस्के नरेश गणपत | ६४ | हिराकांत बेंडू फर्डे |
| ६५ | पाटील सुजाता भास्कर | ६६ | नारायण शंकर पवार |
| ६७ | सोनार सारिका संजय | ६८ | कोकाटे सुधीर विष्णु |
| ६९ | महेश सुरेश वाघ | ७० | वाघ पुजा गणेश |
| ७१ | वहिदा मुस्तफा खान | ७२ | साळवी अपर्णा मिलींद |
| ७३ | साळवी मनोहर रामा | ७४ | महेश जगन्नाथ साळवी |
| ७५ | मनिषा महेश साळवी | ७६ | पाटील मनाली मिलींद |
| ७७ | पाटील मिलींद भारत | ७८ | केणी प्रमिला मुकूंद |
| ७९ | केणी मुकूंद बाळू | ८० | महदिप भुपेंद्रसिंह बिस्ट |
| ८१ | सामंत विलास शिवराम | ८२ | अनिता अरुण बिर्जे |
| ८३ | संजय संतू वाघुले | ८४ | पाटील मालती रमाकांत |
| ८५ | भरत अभिमन्यु चव्हाण | ८६ | टिकमानी लक्ष्मण (लच्छू) |
| ८७ | नाईक राजश्री सुनिल | ८८ | राजे गिरीश अनंत |
| ८९ | यादव रिटा राजनाथ | ९० | काकडे बालाजी दादू |

ठाणे महानगरपालिका ठाणे

| | | | |
|---|---|---|---|
| ९१ | कुरेशी साजिया आई | ९२ | असिया यासिन कुरेशी |
| ९३ | गोटे सिंधू कुंदन | ९४ | भगत सुधीर रामचंद्र |
| ९५ | किणे राजन नारायण | ९६ | पाटील रेश्मा रमेश |
| ९७ | पठाण अशरफ उस्तान | ९८ | अन्सारी साजिर मो युसुफ |
| ९९ | हफिजा नसीरुद्दीन नाईक | १०० | आशरीन इब्राहीम राऊत |
| १०१ | खान मिराज नईम | १०२ | हिरा सिताराम पाटील |
| १०३ | पाटील शैलेश मनोहर | १०४ | मुंडे सुनिता गणेश |

**-: रजा सदस्य :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | चव्हाण सुधाकर वामन | २ | भोसले नम्रता दिपक |
| ३ | पाटील अवंतिका शशिकांत | ४ | ठाकूर अक्षय अनंत |

**-: गैरहजर सदस्य :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | आरज प्रगती भारत | २ | पुर्णेकर जयनाथ यशवंत |
| ३ | स्नेहा अंकुश पाटील | ४ | इंदिसे रेखाबाई मिनानाथ |
| ५ | पांडे संजय श्रीनाथ | ६ | नंदा कृष्णा पाटील |
| ७ | वैती अशोक बारकू | ८ | वेतकर दिपक विजय |
| ९ | संखे मिनल मुकूंद | १० | मोरे रुचिता राजेश |
| ११ | नजीब सुलेमान मुल्ला | १२ | हंडोरे मेघना सुनिल |
| १३ | लोखंडे सुहासिनी सुनिल | १४ | रेखा भालचंद्र पाटील |
| १५ | राजेश भालचंद्र गवारी | १६ | कळंबे मंगल चंद्रकांत |
| १७ | कुरेशी यासीन अय्युब | १८ | विश्वनाथ भगत |
| १९ | मिर्झा जमेला तबस्सूम इनायत बेग | २० | हसिना अब्दुल अजिज शेख |
| २१ | डोंगरे सिराज महम्मद अली | २२ | अन्सारी साजिया परवीन सरफराज |

महापौर

मा.महापौर सो. छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळयास पुष्पहार अर्पण करतात.
तद्नंतर राष्ट्रगीत होऊन सभा दुपारी ठिक १२.२० वाजता सुरु झाली.
मा. महापालिका सचिव सभेची सूचना वाचून दाखवितात.

**मा. महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, आजच्या सभेसमोर सन्मा. सदस्य, सौ. अवंतिका शशिकांत पाटील, सन्मा. सदस्य, श्री. सुधाकर वामन चव्हाण, सन्मा. सदस्या, श्रीम. नम्रता दिपक भोसले, आणि सन्मा. सदस्य, श्री. अक्षय ठाकुर यांचे रजा अर्ज प्राप्त झाले आहेत.

मा.महापौर महोदय, आजच्या सभेसमोर एक सभा तहकूबी, तीन लक्षवेधी आणि दोन दुखवटा ठराव प्राप्त झाले आहेत. त्याचबरोबर एक शोक संदेशही प्राप्त झाला आहे. तत्पूर्वी प्रश्नोत्तराचा तास सुरु करु या का?

**मा.विरोधी पक्षनेते :-**

मा. महापौर महोदय, सभा तहकूबी वाचून दाखववावी.

**मा. महापौर सो. :-**

सभा तहकूबी घ्या.

**मा.महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, सर्वप्रथम प्राप्त सभा तहकूबीचे सुचक सन्मा. सदस्य श्री. जगदाळे साहेब, आणि अनुमोदक सन्मा.सदस्य श्री. म्हस्के साहेब. (मा. महापालिका सचिव सभा तहकूबी वाचून दाखवितात.)

दिनांक :- १८/०२/२०१५

प्रति,
मा.महापौर सो.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
यांसी,
स.न.वि.वि.

विषय :- सभा तहकूबीची सुचना.

**महोदय,**

शुक्रवारी दिनांक २०.०२.२०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये महाराष्ट्र राज्याचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते आर.आर.पाटील यांचे निधन झाल्याबद्दल आम्ही सभा तहकूबीची सुचना मांडत आहे.

राज्याचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते आर.आर.पाटील यांचे निधन दि.१६ फेब्रुवारी २०१५ रोजी झाले असून, निधनसमयी त्यांचे वय ५७ वर्षे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी, मुलगा व भाऊ असा परिवार आहे.

रावसाहेब रामराव पाटील म्हणजेच आर.आर.पाटील यांचा जन्म १६ ऑगस्ट १९५७ साली सांगली जिल्हयातील तासगांव तालुक्यात असलेल्या अंजनी गावात झाला. आबांनी कमवा आणि शिका हा मंत्र



महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

जपत श्रमदान करत शिक्षण घेतले. आरा.आर.पाटील यांना सर्व लोक आबा म्हणून ओळखतात. त्यांची महाराष्ट्रातील प्रसिध्द राजकारणी अशी ओळख होती.

आर.आर.पाटील हे एक उत्कृष्ट वक्ता आणि संसदपटू असल्याने त्यांची राजकिय कारकिर्द अतिशय उल्लेखनीय अशीच होती. सन १९७९ मध्ये सर्वप्रथत त्यांची जिल्हा परिषद सदस्य पदी निवड झाली. त्यानंतर १९६० साली तारगांवचे आमदार म्हणून त्यांनी निवड झाली. सन १९९० ते २०१४ या कालावधीत सलग ६ वेळा ते आमदार होते. सन १९९६ साली त्यांची काँग्रेसचे विधनसभा प्रतोद म्हणून नियुक्ती झाली. सन १९९८ साली ते विधानसभा लोकलेखा समितीचे अध्यक्ष भुषविल्यानंतर सन १९९९ साली ते ग्रामविकास मंत्री झाले. सन २००४ साली गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदी विराजमान झाले आणि या कालावधीत त्यांनी डान्सबार बंदीचा धाडसी निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. त्याबरोबर संत गाडबेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयाचे पालकत्व स्विकारुन विकासकामांना चालना दिली.

आर.आर.पाटील यांनी त्यांच्या उत्कृष्ट वकृत्वशैलीने राजकीय कारकिदीत एक संवेदनशील राजकिय नेता अशी ओळख निर्माण करुन दिली होती. त्यामुळे एक जनसामान्यांचा नेता गमावला आहे अशी सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे.

महाराष्ट्राच्या या लाडक्या व्यक्तीमत्वाला भावपूर्ण श्रध्दांजली वाहून ही सभा तहकूब सुचना मान्य करुन ही सभा पूर्णवेळ तहकुब करण्यांत यावी ही विनंती.

सही /- सही /-

सुचक :- श्री. हणमंत जगदाळे अनुमोदक :- श्री. नरेश म्हस्के

**महापालिका सचिव :-**

मा.महापौर महोदय, यानंतर भारतीय जनता पक्षाचे गटनेते, श्री. संजय वाघुले यांनी दुखवटा ठराव दाखल केला आहे. (महापालिका सचिव दुखवटा ठराव वाचून दाखवतात.)

दिनांक :- १८ फेब्रुवारी, २०१५

प्रति,
मा.महापौर सो.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

यांसी,
सस्नेह नमस्कार !

विषय :- सभा तहकूबीची सुचना.

**महोदय,**

दि. २०.०२.२०१५ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये द:खवटा ठराव घेण्यात यावा ही विनंती.

**<u>द:खवटा ठराव</u>**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते आर.आर.पाटील यांचे सोमवार, दि. १६, फेब्रुवारी, १५ रोजी कर्करोगाने निधन झाले. त्यावेळी त्यांचे वय ५७ वर्ष होते.

सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यातील अंजनी या छोटयाशा गावात सामान्य कुटूंबात जन्मलेल्या आबांना कोणतीही राजकिय पाश्र्वभूमी किंवा वारसा नसताना त्यांनी जिल्हा परिषद ते महाराष्ट्र

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

विधानसभा असा प्रवास केला. सामाजिक जाण, उत्तम वक्तृत्व गुणांमुळे त्यांनी महाराष्ट्राची विधानसभा २५ वर्ष गाजवली आणि अल्पावधीतच उत्कृष्ट संसदपटू म्हणून नाव लौकिक मिळवला.

राज्याचा ग्रामविकास मंत्री ते उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी १५ वर्षात यशस्वी धुरा सांभाळली. २००४ मध्ये राज्यात डान्सबार बंदी कायदा आणून तरुणाईत पसरलेली नशेची विषवल्ली रोखण्याचा प्रयत्न त्यांनी केली.

आर.आर.पाटील यांच्या निधनामुळे राष्ट्रीय काँग्रेसचे न भरुन येणारे नुकसान झाले असून, महाराष्ट्र एका महान नेतृत्वाला मुकला आहे. त्यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी कधीच भरुन न येणारी अशीच आहे.

अशा या पुरोगामी विचारांच्या पुरस्कर्त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटूंबियांवर कोसळलेल्या दु:खात ही सर्वसाधारण सभा सहभागी असून, कै. आर.आर.पाटील (आबा) यांच्या आत्म्यास चिर:शांती व सद्गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करत असून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सही /- सही /-
सुचक :- श्री. संजय वाघुले अनुमोदक :- श्री. मुकेश मोकाशी

**महापालिका सचिव :-**

मा. महापौर महोदय, सन्मा. सदस्य श्री. सुहास देसाई यांचा शोक संदेश प्राप्त झाला आहे तो संदेश वाचून दाखवत आहे.

दिनांक -२०/०२/२०१५

**शोक संदेश**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व गृहमंत्री आर.आर.पाटील यांचे दि. १६/०२/२०१५ रोजी कॅन्सरच्या आजाराने दु:खद निधन झाले. संपूर्ण महाराष्ट्र आबांसारख्या चारित्र्यवान निष्कलंक व प्रेमळ व्यक्तीमत्वास मुकला. आबा आपल्या राजकिय प्रवासात सहा वेळा निवडून आले. आपल्या प्रदिर्घ कार्किदीत त्यांनी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, डान्सबार बंदी, आदीवासी मुलांना दत्तक घेऊन मुख्य प्रवाहात आणणे असे अनेक धडाकेबाज निर्णय आबांनी घेतले. राजकारणातील एक सोज्वळ संयमी चेहरा आणि एक आदर्श नेता आपल्यातून हरपला आहे. आदरणीय आबांना माझ्याकडून, माझ्या कुटूंबियांकडून व माझ्या पक्षाकडून भावपूर्ण श्रध्दांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

**महापालिका सचिव :-**

यानंतर सुचक सन्मा. सदस्य श्री. जगदाळे साहेब आणि अनुमोदक सन्मा.सदस्य श्री. म्हस्के साहेब यांच्याकडून आणखीन एक दुखवटा ठराव प्राप्त झाला आहे तो मी वाचून दाखवतो.

दिनांक :- १८/०२/२०१५

प्रति,
मा.महापौर सो.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
यांसी,
स.न.वि.वि.

विषय :- मा.सर्वसाधारण सभेत दुखवटा ठराव घेणेबाबत.

**महोदय,**

ठाणे महानगरपालिकेच्या आगामी मा.सर्वसाधारण सभेत खालीलप्रमाणे देत असलेला दुखवटा ठराव घेऊन श्रध्दांजली अर्पण करण्यांत यावी ही विनंती.



महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

## दुःखवटा ठराव

रिपब्लिकन पक्ष एकतावादी गटाचे ज्येष्ठ नेते श्री. जगदिश दोधा इंदिसे उर्फ आप्पासाहेब इंदिसे यांचे मंगळवार दि. १७/०२/२०१५ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ ,पत्नी, मुले, मुली, सुना-नातवंडे असा परिवार आहे. रिपब्लिकन पक्ष एकतावादी गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष गंगाराम इंदिसे यांचे ते ज्येष्ठ बंधू होते.

मुळचे नंदुरबारचे आप्पासाहेब इंदिसे हे सन १९६० मध्ये ठाण्यात आले. ठाण्यामध्ये आंबेडकरी चळवळ रुजवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. आप्पासाहेब इंदिसे यांनी परेरानगर भागातील गरीब मुलांची शिक्षणाची सोय व्हावी या उद्दात हेतूने एका शिक्षण संस्थेचीही उभारणी केली होती.

कै. श्री. जगदीश दोधा इंदिसे यांच्या निधनाने त्यांच्या कुटूंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. हे दु:ख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांना देवा व कै. श्री. जगदीश दोधा इंदिसे यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सही /-
सुचक :- श्री. हणमंत जगदाळे

सही /-
अनुमोदक :- श्री. नरेश म्हस्के

**महापालिका सचिव :-**

महापौर महोदय, त्याचबरोबर सुचक श्री. संजय वाघुले व अनुमोदक श्री. मुकेश मोकाशी यांच्याकडून देखिल दुखवटा ठराव प्राप्त झाला आहे तो ही मी वाचतो.

दिनांक :- १८ फेब्रुवारी, २०१५

प्रति,
मा.महापौर सो.
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

यांसी,
सस्नेह नमस्कार !

विषय :- सभा तहकूबीची सुचना.

महोदय,

दि. २०.०२.२०१५ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये दु:खवटा ठराव घेण्यात यावा, ही विनंती.

## दुःखवटा ठराव

रिपाई एकतावादीचे जेष्ठ नेते आप्पासाहेब तथा जगदीश दोधा इंदिसे यांचे मंगळवारी शास्त्रीनगर येथे त्यांचे राहत्या घरी अल्पश: आजाराने निधन झाले. त्यावेळी त्यांचे वय ८० वर्षे होते. ते रिपाई एकतावादीचे राष्ट्रीय अध्यक्ष होते.

ठाणे शहरामध्ये आंबेडकरी चळवळ रुजवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. गरीब मुलांना शिक्षणाची सोय व्हावी यासाठी त्यांनी परेरानगर भागात शिक्षण संस्थेची उभारणी केली आहे.

कै. आप्पासाहेब इंदिसे यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटूंबियांवर कोसळलेल्या दु:खात ही सर्वसाधारण सभा सहभागी असून, कै. आप्पासाहेब इंदिसे यांच्या आत्म्यास चिर:शांती व सद्‌गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करत असून, भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

सही /-
सुचक :- संजय वाघुले

सही /-
अनुमोदक :- मुकेश मोकाशी

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

**श्री. मिलिंद पाटणकर :-**

महापौर महोदय, महाराष्ट्र राज्यासाठीचा अतिशय दु:खद दिवस १६ तारखेला उगवला आणि महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, ख-या अर्थाने लोकनेता आणि गरीबांची काळजी करणारा असा लोकसेवक नेता भले तो राष्ट्रवादी पक्षाचा नेता असला तरी महाराष्ट्राचा नेता म्हणून आबा पाटील सर्व जनतेचे माहितीचे होते. आणि म्हणूनच त्यांच्या दु:खद निधनाने सर्वांनाच धक्का बसला. खरं तर ते गेले चार महिन्यांपासून आजारी होते. त्यांना झालेला दुंदर असा रोग ते कॅन्सरनं आजारी होते हे ही सगळयांना माहिती होते. आणि जेंव्हा-जेंव्हा त्यांच्याबाबतीत चौकशी केली तेंव्हा कळले की, प्रतिसाद मिळतोय ते चांगले होत आहेत, औषधांना पण रिस्पॉन्स मिळतोय. परंतू शेवटी त्या रोगाने आणि नितीने घाला घातला आणि १६ तारखेला आबा हया महाराष्ट्राच्या जनतेला सोडून निघुन गेले. खरं सांगायचे तर राजकारणातील एक प्रमाणिक चेहरा त्या दिवशी हरवला. खरोखर चेह-यावरुन सुध्दा माणसाचा प्रामाणिकपणा जाणवतो. आणि त्यातील आबा होते. काहीही बोलत असलेतरी त्यांचा तो प्रामाणिकपणा बोलताना जाणवायचा. त्यामुळेच आबांना सगळया पक्षातील लोक मित्र मानायचे, सगळे लोक आपले मानायचे. सगळया पक्षातील नेते आपले मानायचे ते त्याच कारणासाठी. परवा १७ तारखेला टी.व्ही. वर अनेक लोकांच्या मुलाखती झाल्या. त्याचवेळी आबांनी २००७ मध्ये केलेले भाषण टी.व्ही. वर दाखवत होते. कदाचित पक्षाच्या मेळाव्यातील वगैरे ते भाषण असेल. परंतू एवढया उंच पदावर पोहचलेल्या माणसाने सुध्दा गरिबी कशी अनुभवलेली आहे हे त्यांच्या शब्दातून ऐकताना डोळयातून पाणी येत होतं. इतक्या गरीबीतून वर आलेला नेता एवढया मोठया पदावर पोहचून सुध्दा परत किती जमिनीवर राहू शकतो आणि इतका प्रामाणिकपणा की, मी सभागृहात बोलताना बेधडक आरोप केले आणि नंतर मला पवार साहेबांनी बोलावून विचारले की, तुमच्याकडे काही पुरावा आहे का? आणि नाही म्हटल्यावर ती मी चुक केली. हे ताबडतोब कबूल करण्याएवढी शक्ती ज्यांच्यात होती असा आबा पाटील नेता होता. आणि त्याच्यामुळे महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय वाईट, राष्ट्रवादी पक्षाला तर अतोनात नुकसान झाले आहे. कारण पवार साहेबांनंतर आणि बहुदा अजून त्यांच्या काही नेत्यांनंतर महाराष्ट्रातील जनतेचा विश्वास असणारा, महाराष्ट्रातील जनतेला प्रामाणिक वाटणारा असा हा नेता त्या पक्षातून आज गेला आहे. निश्चितच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला याचा मोठा धक्का बसणार आहे. याचे मोठे परिणाम सुध्दा त्यांना कदाचित भोगावे लागतील की, यांच्यासारखा नेता आज आपल्या पक्षातून गेलेला आहे. असा हा नेता हरपल्याने निश्चितच सभा तहकूबी तर करायचीच होती. परंतू आबासारख्या माणसासाठी नुसती सभा तहकूब करुन चालणार नाही. तर त्यांच्यातला प्रामाणिकपणा आपणही आपल्यात आणला पाहिजे. आपणही आपल्यात एकमेकांशी बोलताना, सभागृहात बोलताना प्रामाणिकपणाने बोलले पाहिजे. जेणेकरुन जे काही आपण सभागृहात बोलतोय, जो काही विषय मांडतोय, शेवटी सगळेच निवडून आलेले लोकप्रतिनिधी आप-आपल्या प्रभागातील जनतेसाठीच काम करत असतात. परंतू जनतेसाठी काम करताना पण जनतेला जर एखादी गोष्ट जसे आताच कोणाच्या तरी दुखवटा संदेशात सचिवांनी वाचून दाखवले की, काम करा मेहनतीने जे काही कमवायचे ते कमवा आणि मग मोठे व्हा. आजही महाराष्ट्र टाईम्स लोकसत्तेमध्ये बर्वे नावाच्या एका बँकेच्या अधिका-याचे पत्र आहे. तो बँकेचा अधिकारी म्हणून आबांच्या तासगाव गावात गेला होता आणि आबांनी तिथल्या शेतक-याची दु:खनी त्यांच्यासमोर मांडली आणि हे आश्वासन दिले की, तुम्ही हयाना मदत करा. निसर्गाच्या आपत्तीमुळे त्यांना जे काही हाल भोगावे लागत आहे, आपत्ती आहे त्यातून त्यांना बाहेर काढा. त्यांना तुम्ही पैसे, कर्ज दया. आणि मी ग्वाही देतो की, कर्जातला एकही बँकेचा पैसा बुडणार नाही. आणि त्या अधिका-यानी शेवटी पत्र लिहितांना लिहीले आहे की, तिथल्या एकूण-एक शेतक-यांनी आबांचा शब्द म्हणून तो पाळला आणि कर्जाचा एकही पैसा बँकेचा बुडाला नाही. ही जी एक मोठी महंती आबांची होती की, त्यांच्या शब्दासाठी तिथले सगळे लोक जीव दयायला सुध्दा तयार होते. आपण सर्वांनी त्या दिवशी बघितले की, तिथे जमणारा प्रत्येक माणूस हा अगदी मनापासून रडतोय, मनापासून त्यांच्या डोळयात अश्रु येत आहेत अस जाणवत होतं. आबांमध्ये जो प्रामाणिकपणा होता तो त्या दिवशी तासगांवमध्ये आणि अंजनीमध्ये जमलेल्या प्रत्येक नागरिकाच्या चेह-यावर दिसत होता. असे हे आबा पाटील आपल्याला सोडून गेले. महाराष्ट्राचे खरोखर अतोनात नुकसान झालेले आहे. महाराष्ट्रातील राजकारणाचं नुकसान झालेले आहे. कारण राजकारणांबाबत लोकांमध्ये आज जे काही निर्माण झाले आहे म्हणजे राजकारणी म्हणजे ढोंगी,

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

राजकारणी म्हणजे प्रामाणिकपणा नसलेला माणूस. परंतू त्याला छेद देणारे असे आबा पाटील आज आपल्यातून गेलेत. जर आपली प्रतिमा उंचवायची असेल तर आपणही आबांसारखे वागायला शिकणं हीच खरी म्हणजे आबांना श्रध्दांजली दिल्यासारखी होईल. मी या ठिकाणी असे विचार व्यक्त करतो की, आपण असे वागायला सुरुवात करुन आबांना श्रध्दांजली देऊ या. आबांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांचे कुटूंबिय त्यांच्या विभागातले सर्व नागरिक, महाराष्ट्रातील सगळी जनता आणि राष्ट्रवादी पक्षाला हे सगळं दु:ख सहन करण्याची ताकद परमेश्वर ईश्वर देवो ही इच्छा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.

**श्री. संजय घाडीगांवकर :-**

महापौर महोदय, सांगली जिल्हयातील तासगांव तालुक्यातील अंजनी गावचे सुपुत्र आणि राष्ट्रवादीचे एक मजबूत खांब-स्तंभ, ज्यांच्यावर आदरणीय शरद पवार साहेबांची विशेष कृपादृष्टी, आदर माणि मुलाप्रमाणे सन्मान असे हे आदरणीय आबा. आज त्यांच्या निधनाबद्दलची सभा तहकूबी. मला त्यांचा प्रत्यक्ष असा सहवास कधी लाभला नाही एवढा सुदैवी मी नव्हतो. पण माझ्या प्रभागात सांगलीतील जे रहिवासी आहेत जे नागरिक आहेत. त्यांच्याकडून आबांबद्दल वारंवार किस्से ऐकलेत. आणि आपल्या महापालिकेतील कर्मचारी आणि अधिकारी म्हणजे आपले ऑडीटर साहेब, हयांच्याकडून एक किस्सा ऐकला होता की, आबा कसे आहेत. आणि सातत्याने गेले तीन दिवस वर्तमानपत्रामध्ये जे लेख येत आहेत जी पत्र येत आहेत. म्हणजे एक सामान्य कार्यकर्ता घरातील प्रखर विरोध डावलून जिल्हा परिषदेचा सदस्य होतो. नंतर आमदार, मंत्री, उपमुख्य मंत्री आणि ज्या धडाक्याने कामकाज करतो. म्हणजे जी व्यक्ती नव्हती तर ती एक शक्ती होती आणि सामान्यांकरता तो एक आधार होता. ज्या पध्दतीने मागील दिड वर्षामध्ये महाराष्ट्रावर आघात होत आहेत. अनेक नेते आपल्याला सोडून गेले आहेत आणि अवघा महाराष्ट्र हा दु:खात लोटला जातोय. आबा मनमिळावू होते. आपण वाचनातून जर त्यांना बघितले तर आबांबद्दल विरोधक सुध्दा आदराने बोलायचे. ठिक आहे काही दु:खद घटना घडल्या. ज्यामुळे त्यांना पद गमवावे लागले परंतू नव्याने पुन्हा उभारी घेऊन त्या पदाची शान राखण्यामध्ये आणि मिळालेला सन्मान राखण्यामध्ये आबानी जे कर्तृत्व दाखवलं त्याला दाद आहे त्याला तोड नाही. आबांची टळक कामं जर म्हटली तर संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, तंटामुक्ती गांव योजना आणि सर्वांत महत्वाची कामगिरी म्हणजे आबांना ग्राम विकास खाते मिळाले असताना वाडया-वाडयांवर जाणारा हा पहिला ग्रामविकास मंत्री होता. आणि ज्यांनी दु:खाद, दुष्काळात भरडल्या जाणाऱ्या शेतक-याला आधार दिला. गेल्या तीन दिवसांत त्यांच्याबद्दल एवढे वाचन झाले आहे त्यामुळे असे वाटते की, आबांचा थोडा तरी सहवास आपल्याला लाभला असता तर आपल्यालाही त्यांच्याकडून काहीतरी शिकता आले असते. याची खंत आणि हुरहुर मनाला लागून राहिलेली आहे. आबांनी ज्या पध्दतीने कामकाम केले. विरोधक म्हणून म्हणा किंवा सत्ताधारी म्हणा या दोन्ही भुमिका त्यांनी अशा निभावल्या की, आज त्यांच्या निधनानंतर ज्या प्रकारची गर्दी बघायला मिळाली मग ते सर्वपक्षिय राजकिय नेते असो, आमदार असो, खासदार असो कोणीही असो. जो हृदयस्पर्शी धक्का प्रत्येक जनसामान्याला लागला आहे आणि त्यामुळे जे नुकसान झाले आहे ते नुकसान कधीही भरुन न येण्यासारखे आहे. म्हणून माझ्यावतीने माझ्या पक्षाच्या वतीने आदरणीय आबांना मी भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो आणि ही जी सभा तहकूबी मांडली आहे तिला माझे अनुमोदन देतो धन्यवाद.

**श्री. रामभाऊ तायडे :-**

सन्मा. महापौर महोदय, १६ तारखेला जी दु:खद घटना घडली. त्या दिवशी स्थायी समितीची सभा चालू होती आणि वातावरण गंभीर होत चालले होते. आणि स्थायी समितीच्या मिटींगमध्येच निरोप आला आबा गेले. तो निरोप आम्हाला सन्मा. जगदाळे साहेबांनी सांगितला त्यानंतर स्थायी समितीची सभा तहकूब झाली. आबांच्या बाबतीत सांगायचे झाले तर माझे त्यांच्याशी दोन-चार वेळा मा.आठवले साहेबांच्या माधमातून चांगले संबंध आले होते. सात-आठ वर्षापूर्वीचा प्रसंग आहे. खैरांजलीला जे हत्याकांड घडल त्यावेळी सतत शिष्टमंडळ आबांकडे जायचे आणि आरोपींना लवकरच अरेस्ट करा वगैरे गोष्टी व्हायच्या. नंतरच्या शिष्टमंडळामध्ये माझा सुध्दा नंबर लागला. त्यावेळी आमचे दिवंगत मंत्री—

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

शेगावकरदादा होते ते त्यांच्यासोबत मला घेऊन गेले. त्यावेळी आम्ही जवळ-जवळ दहा -बारा लोक होता आम्हाला आबांनी पाऊणतास वेळ दिला होता. सगळेजण आक्रमकपणाने आबांची चर्चा करत होते. सगळेजण चर्चा करत होते म्हणून मला आवरते आले नाही म्हणून मी सुध्दा त्यांच्याशी चर्चा केली. मी आबांना सांगितले आबा साहेब, आपण गृहमंत्री आहात. हया महाराष्ट्रामध्ये हा जो काही प्रकार घडला तो निंदनीय प्रकार घडला आहे असे असताना देखिल त्यांना अजूनपर्यंत अरेस्ट करण्यांत आलेली नाही. काही लोकांना अरेस्ट केली होती परंतू ॲट्रासिटी सुध्दा दाखल केलेली नाही त्या संदर्भात आम्ही गेलो होतो. बोलता बोलता माझ्या तोंडून शब्द निघून गेला मी म्हणालो, आपल्याकडे वकीलांची लाईन लागलेली आहे. आपण ताबडतोब निर्णय घ्यायला पाहिजे. त्यावेळी त्यांनी दादांना विचारले की, हयांचे नांव काय? दादांनी सांगितले हे ठाणे जिल्हयांचे अध्यक्ष आहेत. त्यावेळी त्यांनी मला सांगितले मिस्टर तायडे मी स्वत: वकिल आहे. त्यावेळी मला कळले की, आबा वकिल आहेत. ब-याच लोकांना माहिती नव्हते. मला आश्चर्य वाटले त्यानंतर आम्ही निघून आलो. त्यानंतर दुसरा प्रसंग असा होता दोन वर्षापूर्वी लॉर्ड बुध्दा चॅनेल नागपूर येथे आहे. संपूर्ण भारतभर ते चॅनल आहे. त्या संदर्भातील एक कार्यक्रम नागपूरला झाला. त्या ठिकाणी आबा उद्घाटक होते. देवेंद्र फडवणीस प्रमुख पाहुणे होते आणि मला सुध्दा त्या लोकांनी प्रमुख पाहुणे म्हणनू बोलावले होते. आबांसोबत एकाच स्टेजवर येण्याचे माझे भाग्य होतो परंतू त्यांना सात वर्षापूर्वीच काही आठवले नाही कोण रामभाऊ आणि काय मी एक छोटा कार्यकर्ता. पण भाषण करायला मला सांगितल्यावर मी माझा परिचय सांगितला आणि त्यानंतर मला भाषण करायला दिले. मी भाषण केलं आणि माझ्या जागेवर येऊन बसलो. त्यानंतर त्यांनी मला बोलावून घेतलं आणि मला म्हणाले तुम्ही ठाण्यावरुन एवढया लांब. मी म्हणालो आबा हे माझे गांव आहे. त्यांनतर त्यांनी माझी एवढी चांगली विचारपूस केली. मला म्हणाले तुमचे भाषण छान झाले असेच पुढे जा, मला त्यांनी त्यांच्याकडे बसवून घेतले मला बरे वाटले. आबा म्हणजे नुसतीच त्यांची वाहवा करायची असे नाही तर एका लहानशा गावामधून येऊन एवढे मोठे पद महाराष्ट्रात भुषवतात. तरी सुध्दा त्यांची राहणीमान अतिशय साधी. त्यांच्या निधनानंतर १६ तारखेला दाखवत असताना मी त्यांचे काही मंत्री, काही सुभेदार त्यांच्यासोबत बघितले आबामध्ये होते. हे बघत असताना आबा ही व्यक्ती छोटी पण त्यांच्या चेह-यावर प्रामाणिकपणा दिसून येत होता. आताच माजी उप महापौर श्री. पाटणकर साहेब म्हणाले त्याप्रमाणे स्वच्छ प्रामाणिकपणा त्यांच्या चेह-याबर दिसत होता आणि त्यातून ती व्यक्ती शोभून दिसत होती. अशा आबांचे निधन झाले आहे महाराष्ट्राला आणि भारताला अतिशय दु:ख झालेले आहे. मी आमच्या आठवले साहेबांना कधीही रडताना पाहिलेली नाही. आठवले साहेबांचे त्यांच्याशी फारच चांगले संबंध होते. पण मी परवा आठवले साहेबांना बघितले कारण त्यावेळी आम्ही लांब उभे होतो. आठवले साहेबांच्या डोळयांत आश्रु होते. एवढे चांगले साहेबांचे संबंध होते. साहेब म्हणाले निरागस माणूस गेला. लोकांनी आबांची जी वाहवा केली ती फक्त तोंडापुरती नाही तर आबांची वाहवा मनापासून केली कारण तो माणूस तसा होता. आबांची राहणी साधी आणि उच्च विचार होते. जो माणूस आबांसारखा उच्च पदावर जातो त्यांची मुलं फॉरेनला जाऊन शिक्षण घेतात. परंतू आबांची मुल जिल्हा परिषदेच्या शाळेमध्येच शिकलेली आहेत. मला वाटतं अजूनही शिकत आहेत ही किती मोठी गोष्ट आहे. तेंव्हाची परिस्थिती नाजूक होती मान्य आहे. परंतू आता परिस्थिती सुधारली होती. अशा परिस्थिती सुध्दा आबांनी मुलांवर किती चांगले संस्कार केले ही किती मोठी गोष्ट आहे. आमच्यासारखे बरेच लोक नगरसेवक झालेत. आम्हालाही वाटते आमची मुलं कॉन्व्हेंट स्कूलमध्ये शिकली पाहिजेत, फॉरेनला गेली पाहिजेत. परंतू आबांसारखी व्यक्ती आपल्या मुलांना सांगते की, हे शिक्षण इकडूनच करा, इथूनच तुम्ही आयएस, आयपीएस ऑफिसर,डॉक्टर, इंजिनिअर्स झाले पाहिजे. परवाच बातमी वाचली अंजनी गावातील लोकांनी तंबाखू विरोधी एक धाडसी निर्णय घेतला. आबांचे ज्या आजाराने निधन झाले. ठिक आहे सवय लागली परंतू आबांनी जो आजार झाला त्या आजाराबाबत आबांनी संपूर्ण महाराष्ट्राला संपूर्ण भारताला एक संदेश दिला की, तंबाखू खाणे बंद करा. तंबाखूमुळे मी आज तुमच्यामध्ये नाही. तुम्ही सुध्दा तंबाखू बंद करा आणि आपले आयुष वाढवा असा मॅसेस आबांनी त्यांच्या जाण्यामधून आपल्याला दिलेला आहे. म्हणून आज हया ठिकाणी माझ्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ठाणे शहर जिल्हयाच्यावतीने आणि माझ्या कुटूंबियांच्यावतीने मी, या ठिकाणी आबांना श्रध्दांजली अर्पित करतो. त्याचप्रमाणे परवाच आमचे आंबेडकर चळवळीचे नेते आप्पासाहेब इंद्रिसे यांनी जवळ-जवळ ४० ते ५० वर्षापासून ठाणे शहरातील चळवळीमध्ये भाग घेतलेला आहे. तसेच त्यांच्या

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

परेरानगर, शास्त्रीनगरमध्ये गोरगरिबांना त्यांनी त्या ठिकाणी वसवलेले आहे. त्यांना घरं दिलेली आहेत. त्यांना त्या ठिकाणी रोजगार दिलेला आहे. त्यांच्यासाठी शाळा सुरु केलेल्या आहेत. असे आमचे अप्पासाहेब इंदिसे गेले काही दिवस आजारी होते, ८० वर्षाचे होते. ते आपल्यातून निघून गेलेले आहेत. त्यांच्या कुटूंबावर हे दुःख कोसळलेले आहे. त्यांच्या कुटूंबियांना आणि आबांच्या कुटूंबियांना सुखी व समृध्दी जीवन जगण्यासाठी शक्ती देवो अशी मी भगवान बुध्दांना प्रार्थना करतो. आबांना आणि आप्पासाहेबांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. इथेच थांबतो धन्यवाद. जय भिम, जय भारत.

**श्री. रेश्मा पाटील :-**

मा.महापौर महोदय, महराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे निधन झाले. राज्याचे ग्राम विकास मंत्री पद सांभाळताना त्यांनी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबवून स्वच्छतेचा संदेश घरोघरी पोहचविण्याचे मोठे काम केले. तसेच राज्याच्या गृहमंत्री पदाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी लेडीज डान्स बारवर बंदी आणली. त्यामुळे तरुण पिढी बरबाद होण्यापासून वाचली, अनेक संस्कार बरबाद होण्यापासून वाचली. तंटा मुक्ती गांव अभियान राबवून सामाजिक संर्घष कमी करण्याचा प्रयत्न आबांनी केला. राज्याच्या पोलिस दलात अधिक संख्येने महिलांना समावून घेतले. मुर्ती लहान व किर्ती महान अशा नेत्यांबाबत बोलू तेवढे कमी. अशा या महान नेत्यांना माझी भावपूर्ण श्रध्दांजली. धन्यवाद.

**श्री. उमेश पाटील :-**

मा. महापौर महोदय, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आबा यांचे दिनांक १६ तारखेला दुःखद निधन झाले. खरंतर आबा इतक्या लवकर सोडून जातील असे कोणालाही वाटले नव्हते. आबांचे वय अवघे ५७ वर्ष होतं. गेले तीन महिने ते लीला हॉस्पीटलमध्ये ॲडमीट होते. पण जो सर्वांना आवडतो तो देवालाही आवडतो आणि देव त्याला घेऊन जातो. पण आबांबाबत बोलायचे झाले तर आबा ज्यावेळी ग्रामविकास मंत्री होते त्यावेळी त्यांनी संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान सुरु केले. आबांनी हे अभियान सुरु करुन गप्प बसले नाहीत तर प्रत्येक खेडगांवात जाऊन आबांनी त्या गांवात काय परिस्थिती आहे ती पाहिली. एका वेळी ते पंचवीस ते तीस ठिकाणी जायचे आणि त्या गावांचा अहवाल घ्यायचे. एका शेतकरी कुटूंबात जन्माला आलेले आबा जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले. त्यावेळी त्यांची परिस्थिती अतिशय गरीबीची होती. त्यांच्या अंजनी गांवात राहणा-या त्यांच्या मित्रांनी कोणी त्यांना शर्ट दिलं, तर कोणी त्यांना पायातली चप्पल दिली. अशा शेतकरी कुटूंबात जन्माला आलेले आबा पुढे राज्याचे उप मुख्यमंत्री होतील असे कोणाला वाटले नव्हते. आबा आणि माझा संबध आला तो म्हणजे माझे बंधू मा.श्री. दशरथ पाटील जे राष्ट्रवादीचे त्यावेळी उपाध्यक्ष होते. त्यांच्याबरोबर मला आबांकडे जाण्याचा योग आला होता. त्यावेळी त्यांच्याशी ओळख झाली त्यावेळचा एक किस्सा सांगतो. ठाणे महापालिकेचे ज्यावेळी श्री. नजीब मुल्ला विरोधी पक्षनेते झाले त्यावेळी नजीब मुल्ला म्हणाले, आपण मुंबईला जाऊ या. त्यावेळी आम्ही आबांकडे गेलो आणि आम्ही आबांना सांगितले आम्ही ठाण्याहून आलेलो आहोत. आबांनी आम्हाला बोलावून घेतले नजीब मुल्ला विरोधी पक्षनेते झालेले होते परंतू ठाणे शहरामध्ये जर पक्ष वाढवायचा असेल तर डावखरे साहेब, जितेंद्र आव्हाड आणि गणेश नाईक यांनी एकत्र राहिले पाहिजे अशी भावना त्यावेळी त्यांची होती. वास्तविक पाहता तळागाळात असणारा हा नेता, सर्वांना विश्वासात घेणारा हा नेता गेल्याने महाराष्ट्र राज्याचे नुकसान झालेले आहे. आबा सांगत मी जगाच्या कुठल्याही कोप-यात असेन परंतू माझा गांव माझ्यासाठी महत्वाचा आहे. माझी जनता माझ्यासाठी महत्वाची आहे. आबांकडे येणारा प्रत्येक नागरिक हा माझ्या कुटूंबातील आहे असे आबांनी पाहिलेले आहे असे आबा गेल्याने महाराष्ट्राचे नुकसान झालेले आहे. कारण पवार साहेबांनंतर महाराष्ट्रामध्ये दुसरा नेता आबा होते. आबा ज्यावेळी विधानसभेत बोलायला उभे रहायचे त्यावेळी संपूर्ण सभागृह आता आबा बोलत आहे आबांचे भाषण आपण ऐकले पाहिजे मग ते पत्रकार असतील, नागरिक असतील आबा बोलत आहेत आपण ऐकले पाहिजे असे हे आबा. आबांच्या निधनाने अतिशय नुकसान झालेले आहे. माझ्या पाटील परिवारांतर्फे मी त्यांच्या दुःखात सामिल होतो आणि त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. मनोज शिंदे :-**

दि. १६ तारखेला सकाळपासून आबांच्या निधनाची चर्चा सुरु होती. कधी ते गेले तर कधी गंभीर अवस्थेत आहेत अशाप्रकारची चर्चा चालू होती. दुपारी ३.०० च्या सुमारास त्यांचे निधन झाले अशाप्रकारची बातमी संपूर्ण महाराष्ट्रभर समजली. आबांची आणि माझी पहिली भेट अशी होती की, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ज्यावेळी एकत्र होते त्यावेळी ठाण्यामध्ये एक चांगला वक्ता आणायचा होता त्यावेळेला सांगलीच्या तासगांवच्या एका कार्यकर्त्यांनी आपण आबांना घेऊन येऊ अशाप्रकारची मागणी केली. त्यावेळी मला नेमके कळले नाही आबा म्हणजे कोण? कारण आज सर्वसाधारण घरांमध्ये जे संस्कार आहेत त्यामध्ये दादा, आबा, आप्पा अशाप्रकारचे ऐकायला थोडसं लांबचे झालेले आहे. परंतू ठाण्यामधील एक कार्यकर्ता आबांना भाषणासाठी बोलवा असे जेंव्हा सांगतो. तेंव्हा संपूर्ण महाराष्ट्र त्यांना आबा म्हणून घरातला मोठा भाऊ म्हणून स्विकारतो. अशाप्रकारचा नेता त्या ठिकाणी फक्त भाषणासाठी बोलवा. एवढं काय भाषणामध्ये आहे आणि एवढी काय लौकिकता आहे त्याच मला कुतुहल वाटत होते. परंतू आबा ठाण्यामध्ये आल्यानंतर त्यांचे भाषण जेंव्हा मी ऐकले ते भाषण एवढं प्रभावी होते की, विलावरावाच्या भाषणाच्या शैलीनंतरचे भाषण वैयक्तीकरित्या जर मला आवडलं असेल तर ते आबांच भाषण मला आवडलं होते. आबांच्या निधनाच्या बातमीने संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला. आम्ही देखिल त्वरीत येथून निघालो आणि निघताना आम्ही आमच्या विरोधी पक्षनेत्यांना विचारले आबांचा पार्थिव देह हॉस्पीटलमध्ये आहे की, घरी आहे. राष्ट्रवादी भवनला थोडा उशिरा पोहचल्यामुळे आम्ही थेट राष्ट्रवादी भवनला गेलो. आबांच्या केविलवाणी लहान दोन मुली आणि आजुबाजूला जो घरोबा दिसत होता तो राजकिय नेत्याचे घर नसल्यासारखा घरोबा दिसत होता. म्हणजे त्या ठिकाणी त्यांच्या दोन मुली आणि कुटूंब होतं तिथं कुठल्याही तो-हयाचे त्या ठिकाणी दर्शन होत नव्हतं की, उपमुख्यमंत्री झालेल्या नेत्याचे कुटूंब कसं असतं तशाप्रकारचं वातवरण तिथे नव्हतं तिथे अगदी सरळ आणि साध्या राहणीमानातल वातावरण संपूर्ण आजूबाजूला दिसत होत. रात्री उशिरा आबांचा देह तासगांवला नेण्यात आला. मला आठवतय मी जेंव्हा प्रथम आमदारकीला उभा होतो त्यावेळेला त्यांना पुन्हा बोलावले होते आणि ते विलासरावाबरोबर आले होते. त्यावेळी त्यांना मला सांगितले होते मनोज तुझा निर्णय मला माहिती आहे. पण ख-या अर्थाने तु लढत आहेत ही फार मोठी गोष्ट आहे. आणि त्यांच्यानंतर माझे जे संबंध होते ते वैयक्तीकरित्या फार जवळ जवळ होत चालले होते. नागपुरच्या अधिवेशनानंतर मी त्यांना त्यांच्या घरी डावखरे साहेबांबरोबर बघायला गेलो. तेंव्हा असे होईल असे वाटले नव्हते. त्यांना बघायला आलेल्यांना ते राहून राहून हेच सांगत होते की, आमच्या काळामध्ये तंबाखूचे सेवन आम्ही सहजरित्या सर्व करत होतो. मी चार महिन्यापूर्वी त्यांना ते आजारी असताना भेटलो तेंव्हा त्यांना याची जाणीव झाली होती की आपण आता यातून दूर निघून जाणार आहोत. त्यामुळे ते सतत अनेक चर्चा करत असायचे. त्यापैकी एक चर्चा अशी होती की, त्यावेळी तंबाखूबाबत अधिक जागरुकता नसल्यामुळे गावाकडे अशाप्रकारे तंबाखूचे सेवन सर्वच नेत्यांकडून होत गेले. आपणही पाहिले आहे की, आता अलिकडे बरेचसे मोठे नेते हे कर्करोगाने गेले आहेत. त्यांच्या बोलण्यामधून हे जाणवत होते की, काही चुका अनुषंगाने परिस्थितीनुसार झालेल्या आहेत त्या आता परत होऊ नयेत. आणि मुळात कर्करोगावरील निदान सर्वसामान्य गरीब लोकांना परवडणारे नाही. त्याच्यावर ईलाज केला पाहिजे अशाप्रकारची सतत चर्चा ते त्या ठिकाणी करत होते. याच दरम्याने आमचे पत्रकार आप्पा भानुशाली त्या ठिकाणी आले त्यांनी विचारले आबा तुम्हाला कसं वाटतयं? आबा म्हणाले मला थोडं बरं वाटतय मी लवकरच रिकव्हर होईन. आम्ही गांवाकडची माणसं एकादा शिवीला सुध्दा आम्ही प्रेमाने घेतो अशाप्रकारचे आमचे राहणीमान. मी एका मोठया पदावर गेल्यावर एक लहान शब्द माझ्या तोंडातून गेला त्याचा किती मोठा अहःकार झाला. म्हणजे आजची समाजामधली बांधिलकी ही आज सुटत चालली आहे अशाप्रकारे त्यांनी त्यांचे मत व्यक्त केलं. त्यामुळे एक मोठया विचारांचा माणूस जिल्हा परिषदेचा सदस्य ते उप मुख्यमंत्री म्हणजे विलासरावांसारखीच एक-एक पायरी चढत परंतू आपल्या सरळ साधेपणाला न विसरता राहणीमान कायम ठेवणारे आबा आमच्यातून निघून गेले. मला आठवते आघाडीच्या वेळेला आण्णा हजारेना आघाडीच्या निर्णयाबाबत थोडीशी कडूता होती त्यावेळेला आघाडीच्या हातावर मोजता येणा-या नेत्यांमध्ये आबा असायचे. त्यावेळी प्रामुख्याने आण्णा हजारे चर्चेसाठी स्विकारत. पंधरा-वीस नांव पाठविल्यानंतर आबा असतील तर मी चर्चा करेन. अशाप्रकारे आघाडीमधील नेतृत्त्व होते की त्यांना गांधी विचारांचा नेता देखिल स्विकार करीत असतं. आणि अशाप्रकारचे नेते जेंव्हा त्यांच्या काही

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

चुकांमुळे जात असतात तेंव्हा ते आपल्याला संदेश देत असतात की, अशा गोष्टी करुन जाऊ नये. आबांनी त्यांच्या माध्यमातून संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान राबविले. फार पूर्वी राबविलेले ते अभियान आज भारताना पंतप्रधान मोदी यांच्या माध्यमातून कळायला लागले आहे, सुचायला लागले आहे. त्याचा प्रसार वाढायला लागला आहे. म्हणजे गांधीजीचे अभियान संत गाडगेबाबांनी सुरु केलं आणि त्याला चांगली चालना उप मुख्यमंत्री आबांनी या ठिकाणी दिली. आबांचं नाव मोठया नेत्यांना आर.आर.पाटील माहिती आहे. आणि गांवातील कुठल्याही व्यक्तीला आबां व्यतिरिक्त त्यांच नाव देखिल माहिती नाही. सर्वसामान्य कार्यकर्त्यांना त्यांना नांव माहिती नाही. या ठिकाणी मुंबईमध्ये ते नेते म्हणून वावरायला लागले गृहराज्यमंत्री असताना त्यांनी या संपूर्ण मंबईमध्ये महाराष्ट्रामध्ये लेडीज डान्सबारमुळे घरं बरबाद होत आहेत, संसास उद्वस्त होत आहेत त्या लेडीजबारवर आबांनी हातोडा आणण्याची सर्वप्रथम कल्पना आबांची होती. पण ज्या दिवशी आबा गेले त्या दिवशी नाईट लाईफ नावाच्या संस्कृतीलापण उजाळा मिळाला हे दुर्दैवाने सांगावेसे वाटते. अशा गोष्टी घडू नयेत. शेवटी एखादा नेता जेंव्हा उभा राहतो तेंव्हा तो नेता पक्षाच्या अजेंडयाबरोबर स्वतःचा अजेंडा राबवतो. त्याला असे वाटत असते की, मी जर नेता आहे तर माझ्या अनुषंगाने लेडीजबारसरखा विषय संपायला पाहिजे जो काळीमा फासणारा आहे. अशा विचारधारांच्या नेत्यांच्या विचारांना तिलांजली मिळू नये हेच या ठिकाणी सांगावेसे वाटते. माझे मित्र, माजी उप महापौर श्री. पाटणकरांनी या ठिकाणी सांगितले की, आबांकडून काही उपदेश घेतले पाहिजेत. त्यानुसार त्यांनी जे लेडीजबार बंद केलेले आहेत त्या माध्यमातून आपण महापालिकेने देखिल फार चांगली पाऊलं त्य दिशेन उचलली आहेत. ती पाऊलं पुढे थांबली नाही गेली पाहिजेत. लेडीजबार संसार उध्वस्त करणारा धंदा आहे तो आयुक्त साहेब आपण देखिल जोमाने बंद करताहात त्याला आपण देखिल सर्वांनी पाठिंबा दिला पाहिजे. पण एक राजकिय नेता आणि एक प्रशासकिय अधिकारी म्हणून आपण जरी ते करीत असलो तरी काही नागरिकांच्या मनामध्ये अशाप्रकारची जी दृष्टी आहे ते घालविण्यासाठीचे प्रयत्न सुध्दा या ठिकाणी झाले पाहिजेत. मी माझ्या कुटूंबियांच्या माध्यमातून, माझ्या पक्षाच्या वतीने हया विझलेल्या दिव्याला श्रध्दांजली वाहतो. असा मोठा माणूस हरपलेला आहे, त्या माणसाचे विचार, त्या नेत्याचे विचार, त्या कार्यकर्त्यांचे विचार आणि त्यांनी दिलेले उपदेश, त्यांच्या मनामध्ये असलेले खंत हया सर्व गोष्टी सोबत घेऊन आपण भविष्यात त्यांना न विसरता येणारं काम करु असे मी या माध्यमातून अपेक्षित धरतो. त्याचप्रमाणे आप्पा इंदिसेंसारखे आंबडेकरी चळवतीतील नेते आज आपल्यातून हरपले आहेत. आप्पा इंदिसे म्हणजे हया सभागृहामध्ये नव्हेतर हया ठाण्यामध्ये प्रत्येकाला ज्ञात असलेले नेते होते. त्यांचा सहवास या ठिकाणी सर्वांना लाभलेला आहे. आप्पांनी देखिल अतिशय खडतर आयुष्यातून आंबेडकरी चळवळ निर्माण करुन एक संघटना स्थापन करुन त्यांच्यामागे सतत उभे राहून आंबेडकरी चळवळीतून नगरसेवक या सभागृहात पाठविण्याचे काम त्यांच्या हातून घडलेलं आहे. या दोघांनाही मी या ठिकाणी श्रध्दांजली वाहतो. आणि ही सभा तहकूब करण्याची जी सूचना सभागृहनेते आणि विरोधी पक्षनेत्यांना मांडलेली आहे. मा.महापौर साहेब आपण तिला मान्यता दयाल जेणेकरुन ती खरी श्रध्दांजली असेल. एवढेच या ठिकाणी सांगतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**श्रीम. अपर्णा साळवी :-**

मा.महापौर महोदय, १६ फेब्रुवारी २०१५ रोजी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री, गहमंत्री, ग्रामविकास मंत्री आर.आर.पाटील साहेब, यांचे दुःखद निधन झाले आणि संपूर्ण महाराष्ट्र हा दुःखाच्या सागरात बुडाला. वास्तविक पाहता आजच्या हया तहकूबीनिमित्त ही जी श्रध्दांजलीपर सभा आहे तर हया सभेमध्ये आर.आर.पाटील साहेब हयांच्याबद्दल बोलण्या इतकी मी मोठी नाही. मकी कार्याने आणि वयाने सुध्दा फार लहान आहे की, एवढया मोठया महान व्यक्ती बद्दल बोलयचे तर सुर्यासमोर काजव्याने चमचम करण्यासारखं आहे. पण तरी देखिल त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अश श्रध्दांजली अपर्ण करताना मी त्यांच्याविषयी काही गोष्टी आपणांसोबत शेअर करत आहे. आपणां सर्वांना कल्पना असेल की, आर.आर.पाटील साहेब हे साधी राहणी उच्च विचार या संकल्पनेचे किंवा या विचारांचे जिवंत उदाहरण होतं की, माणसाने कसे रहावे आणि कसं वागावं. वास्तविक पाहता, सगळया उच्च पदांवर कामं करताना मग ती प्रशासकिय सेवेत असू देत किंवा राजकिय स्वरुपाची असू देत. त्या त्या उच्च पदावर जेंव्हा ती व्यक्ती पोहचते. तेंव्हा त्यांच्या कार्यपध्दतीत जीवनशैलीत नेहमीच फरक येतो. परंतू आबा ही अशी व्यक्ती होती

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

की, त्यांनी त्यांच्या जीवनशैलीत सुरुवातीपासून शेवटपर्यंत कुठलाही बदल आणला नाही. आता तायडे भाऊंनी आबांच्या मुलांच्या शिक्षणाबद्दल सांगितले की, आबांची मुलांच्या शिक्षणाची जी काही पध्दती होती ती त्यांनी बदलली नाही तीच पध्दत शेवटपर्यंत ठेवली. यातून त्यांनी महाराष्ट्रातील आपल्या सर्व जनतेला एक नविन आदर्श दिला आहे की, केवळ मोठ-मोठया शाळांमध्ये किंवा बाहेर जाऊन घेतलेल्या उच्च शिक्षणानेच आपली मुल शिकतात आणि सुसंस्कृत होतात असं नाही. तर आपल्या स्थानिक शैक्षणिक संस्था किंवा जिल्हा परिषदेच्या शाळाच्या माध्यमातून सुध्दा आपण आपल्या मुलांना मोठं करु शकतो आणि याच त्यांच्या विचारातून आपल्याला त्यांच्याकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे. या शिवाय त्यांच्याबद्दल बोलायचे तर आज इथे महिला भगिनी आहेत. आज आम्ही महिला भगिनी राजकिय क्षेत्रात सुध्दा वाटचाल करीत आहोत. परंतू प्रत्येक भगिनीचे एकच स्वप्न असते की, आपला संसार हा सुखाचा व्हावा. आपल्या संसारातील रथाचे जे दुसरे चाक आहे ते दोन्ही चाकं ही बरोबर चालावित. परंतू जेंव्हा रथाचे एक चाक हे लेडीज डान्सबार सारख्या विचित्र अशा भोव-यात सापडते. तेंव्हा त्या कुटूंबावर कु-हाड कोसळते. अशा प्रश्नाला आबांनी हात घातला आहे. म्हणून आज आपण जर सर्व महिलांचे सर्व्हेक्षण केलं तर सर्वांच्या मुखातून एकच नांव येतं की आबा. कारण आबांनी आमचे संसार वाचवले आहेत. भले त्यांनी प्रयत्न केले, त्यांनी सुरुवात केली, आणि त्यापुढे ब-याचशा गोष्टी झाल्या. आता नविन गोष्टी येत आहेत. पण ते धाडस दाखविणे सुध्दा महत्वाचे आहे. त्यांनी दाखवलेल्या धाडसाच्या वेळी त्यांना कितीतरी प्रकारे विरोध सहन करावा लागला असेल, कितीतरी प्रकारचा त्रास झाला असेल. पण तरी देखिल न जुमानता आपल्या भगिनींसाठी त्यांनी हे जे धाडसी पाऊल उचलले त्यामुळे आम्हा सर्व भगिनींचा आबांना सलाम. या व्यतिरिक्त प्रत्येक गांव आणि खेडयांमध्ये तंटामुक्ती योजना, संतगाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान आता आपल्या संपूर्ण भारतामध्ये स्वच्छ भारत अभियान जोमाने चालू आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे. आता आपला देश स्वच्छ होण्याच्या मार्गावर लागला आहे. परंतू ती सुरुवात गेल्या कित्येक वर्षापासून ग्रामविकास मंत्री आपल्या आबांनी त्याची सुरुवात केली होती. सुरुवातीच्या काळात सुध्दा त्यांनी खेडोपाडी जाऊन केवळ योजना जाहिर न करता त्या योजनेमध्ये ते सहभागी झाले होते. त्यांच्याकडून हया ज्या काही गोष्टी आहेत त्या नक्कीच शिकण्यासारख्या आहेत. आबांनी आपल्याला ब-याचशा गोष्टींचे ज्ञान करुन दिलं आहे आणि बरीचशी शिकवण आम्हाला दिलेली आहे.

आबांबद्दल सांगताना काही जवळून आलेले अनुभव. आपले माजी महापौर मनोहरजी साळवी यांचे त्यांच्याशी अतिशय मैत्रीचे नातं होतं. मी दोन ते तीन कारणांमुळे गेल्या आठ वर्षामध्ये तीन वेळा आबांच आमच्याकडे येणं झालं. सांगण्याचा मुद्दा हा की, आमच्याकडे बरीचशी मंत्रीमंडळी आलेली आहेत अजूनही येतात. पण जेंव्हा आपल्य घरामध्ये असा एखादा पुढारी येतो त्यावेळी घराच्या महिलांना थोडंस दडपण असतं की, मंत्री महोदय, जेवायला येताहेत. काय करायचे काय नाही, कसं काय वातावरण असेल असं थोडसं दडपण असतं. पण एकच ही अशी व्यक्ती होती की, जे सहजतेने आमच्या घरी दोन्ही वेळा वावरले. आमच्या दोन्ही मुलांबरोबर त्यांनी अर्धा तास गप्पा मारल्या. पत्रकार मंडळी बाहेर वाट बघत होती. आबांनी सांगितले आज मला निवांत वेळ आहे. ही गोष्ट आहे पाच वर्षापूर्वी आर.आर.पाटील साहेब आपल्या लोकसभा निवडणूकीच्या वेळी प्रचाराच्या वेळी शेवटच्या दिवशी आले होते आणि ही शेवटची प्रचार सभा झाल्यानंतर आमच्याकडे हा जेवणाचा कार्यक्रम होता. हा मुद्दा सांगण्याचा उद्देश असा की, तुम्हाला जेवायला काय, माझे जेवण अगदी साधे आहे जे काही असेल ते चालेल. हा मुद्दा आहे त्याचे सांगण्याचे तात्पर्य असे की, एवढी मोठी व्यक्ती असून सुध्दा आम्हाला कुठल्याही प्रकारचं दडपण किंवा संकोच आम्हाला वाटला नाही. अजून एक दुसरे उदाहरण दयायचे झाले तर काही वर्षापूर्वी गणपतींसाठी आमच्या मोठया सास-यांकडे साहेबांचे येणं झालं. गणपतीच्या दर्शनाला हॉलमध्ये येऊन साधारणपणे सगळी मंडळी निघून जातात. पण आमच्या लहान जाऊबाईंनी मला खास सांगितलं की, मला त्यांच्याबरोबर फोटो काढायचा आहे. मी म्हटलं तुम्हाला तर राजकिय नेत्यांची फारशी आवड नाही. तुम्हाला त्यांच्याबरोबर फोटो का काढायचा आहे ? त्या म्हणाल्या ताई मला ते व्यक्ती म्हणून फार आवडतात. कारण त्यांनी महिलांचा विचार केलेला आहे. यावरुन तुम्ही म्हणाल हया काय सांगताहेत. पण उद्देश हाच आहे की, आमच्या घरातील ज्या महिलेला राजकिय लोकांशी काहीही देणं-घेणं नाही किंवा राजकिय लोकांबद्दल कुठलीही अस्था नाही. असतो एक गट असा असतो की, ज्यांना राजकिय लोकांबद्दल कुठल्याही प्रकारची आस्था नसते. पण देखिल तिच्या मनात आबांबद्दल असलेली आस्था हे दाखवून देते की, ती व्यक्ती"

काहीतरी इतरांपेक्षा वेगळी होती. हे झाले आमचे अनुभवाचे मुद्दे. एका वर्षी शुटींग बॉल फेडरेशनच्या सामन्यांसाठी प्रमुख पाहुणे म्हणून आबा आले होते. त्यावेळी खेळाडूंना सुध्दा त्यांनी इतक्या चांगल्यारितीने मार्गदर्शन केलं की, भारताच्या कानाकोप-यातून खेळाडू आले होते. पंजाब, अमृतसर, नेपाळ येथून खेळाडू आले होते. त्या लोकांना आबा या व्यक्तींबद्दल काहीही माहिती नव्हती. पण आबांच्या भाषणानंतर त्यांनी नानांकडे विचारपुस केली की, कोण था वह आदमी? कारण आबांनी त्या खेळाडूंना अतिशय खेळीमेळीच्या भाषेमध्ये खेळाबद्दल, त्यांच्या भवितव्याबद्दल आणि आजच्या आपल्या देशाच्या मागणी बद्दल की, हया खेळाडूंकडून आपल्या देशाची आणि राज्याची काय मागणी आहे. हया संदर्भातील त्यांचे भाषण इतके इम्प्रेसीव्ह झाले की, सर्व खेळाडू हे त्या व्यक्तीची वाहवा करत होते. याचा अर्थ त्यांनी खेळ, महिला वर्ग, त्याचप्रमाणे राजकिय आणि आपल्या देशाच्या आणि राज्याच्या दृष्टीने करण्यांत येणारी सर्व महत्वाची कामं यात आबा कुठेही कमी पडले नाहीत. पण असंच असतं नियतीला बघवत नाही. नियतीचा खेळच वेगळा असतो. आणि म्हणूनच अशा छुप्या पावलांनी येणा-या कॅंसरने त्यांना ग्रासलं पण जाता-जाता सुध्दा आबांनी आपल्याला संदेश दिला आहे, एक शिकवण दिली आहे की, माझा जर यामधून अंत झाला तरी तुम्हाला अजूनही वेळ गेलेली नाही. आबांच्या गांवक-यांच खरंच करावे तेवढे कौतुक थोड आहे. कारण त्यांनी जो निर्णय घेतला आहे तो त्यांच्या गावापुरताच न राहता आमची छोटीशी इच्छा आहे की हा निर्णय समस्त महाराष्ट्रामध्ये तंबाखू विरोधी अभियान या दृष्टीने राबविण्यात यावा. अजून एक महत्वाची आबांबद्दल सांगायची गोष्ट वृत्तपत्रामधून वाचण्यात आली आहे की, आबांनी हा निर्णय घेतलेला की मरणानंतर माझ्या दशक्रियेसहीत कुठल्याही विधी करु नयेत. असा निर्णय घेण्याचे धाडस सुध्दा आगळी वेगळी व्यक्तीच घेऊ शकते. कारण आपण कितीही भाषणं करतो. अवयवदाना बद्दल, देहदानाबद्दल परंतू स्वतः त्यामध्ये किती ॲक्टीव्ह हे प्रत्येक व्यक्तीवर अवलंबून असते कारण ते धाडस होत नाही. आणि मरणानंतर आपले विधीही होऊ नयेत असं सांगणं म्हणजे त्यांच्या धाडसाला सलाम. आज हया ठिकाणी आबांबद्दल सांगण्यासारखे बरेच आहे. परंतू सरसकट सगळयांनाच आबांबाबत बोलण्याची इच्छा आहे. आज माझ्या संपूर्ण परिवारातर्फे, त्याचप्रमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेस, उपस्थित सर्व पक्षिय सभागृहातर्फे आणि तमाम ठाणेकरांच्यावतीने मी आबांना मनःपूर्वक श्रध्दांजली वाहते आणि जाता जाता एकच सांगेन की, आबांच्या जाण्यामुळे जी ही पोकळी निर्माण झाली आहे ही पोकळी महाराष्ट्रासाठी तर फारच मोठी आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेसची लोकप्रतिनिधी हया नात्याने मला असं सांगायला आवडेल की, आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा चेहरा आम्ही गमावला आहे. कारण आबांच्या माध्यमातून आज आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा चेहरा हा उजळलेला होता. त्यामुळे आज आमच्या सर्वांची जबाबदारी वाढलेली आहे त्यांची पोकळी भरुन काढण्याची. पुन्हा एकदा आबांच्या आत्म्याला चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करते. त्याचबरोबर त्यांच्या कुटूंबियांना आणि त्यांच्या सर्व हितचिंतकांना हे दुःख सहन करण्याची शक्ती ईश्वर देवो अशी मनपूर्वक प्रार्थना करते. हरी ओम.

**श्री. सुधीर भगत :-**

महापौर महोदय, आजच्या हया सभेला आपण सभा तहकूबी घेतलेली आहे ते आर.आर.पाटील यांच्याशी माझ्या परिवाराचे आमदार भोईर साहेब यांचे फार जवळचे संबंध होते. मी माझ्या दोन्ही परिवाराच्यावतीने श्रध्दांजली वाहण्यासाठी उभा असताना प्रकर्षाने आपणांस सांगे इच्छितो की, मला ते नांवाने हाक मारायचे. कोणत्याही प्रकारे पक्षपातीपणा न करता ज्यावेळी मी त्यांच्या सांनिध्यात होतो त्यावेळी मी मा.भोईर साहेब, हयांच्याबरोबर आठवडयातून दोन-तीन वेळा त्यांच्याकडे जायचो. हया ठिकाणी आता जगदाळे साहेब सुध्दा उपस्थित आहेत. आबांची बातमी टि.व्ही.वर बघताना माझ्या डोळयात पाणी येत होते. फार कमी नेते असतात की जे त्यांच्या भागातील कार्यकर्त्यांना नावांने ओळखतात परंतू मुंबई सारख्या शहरामध्ये जे काही कार्यकर्ते असतात त्यांना देखिल ते नांवाने ओळखत असतं. मा. भोईर साहेबांचे जे काही निरोप असत ते आम्ही त्यांच्यापर्यंत पोहचत होतो. मला या ठिकाणी अजून एक गोष्ट सांगावीशी वाटते की, मी माझ्या कार्यकर्त्यांना त्यांच्याकडे घेऊन गेलो होतो त्यावेळी ते त्यांच्या घरी निवांत बसलेले होते. आमची चर्चा झाल्यानंतर ते म्हणाजे सुधीर त्यांना आण आपण फोटो काढू. अशी ही व्यक्ती त्यांनी सर्वच अगदी जवळचे होते. ज्यावेळेस मी त्यांच्या घरुन बाहेर निघालो तेंव्हा माझ्या बरोबरचे कार्यकर्ते माझ्यावर अतिशय खुष झाले. कारण आबांनी त्यांची असे स्वागत केले होते की, माझे कार्यकर्ते

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

माझ्यावर खुष झाले. मला म्हणाल किती साधे आहेत, आपल्याला जवळ घेतले, आपल्याबरोबर खांदयावर हात ठेवून फोटो काढला. अशी ही हवी हवीशी वाटणारी व्यक्ती ज्यावेळी आपल्यापासून दूर जाते त्यावेळी आपल्या हृदयामध्ये एक पोकळी निर्माण होते. त्या दिवशी टि.व्ही. वर आपण सर्वांनी पाहिले असेल की, त्या गांवातील लोक, ती वृध्दबाई म्हणत होती आमचा आबा गेला, आम्हाला स्टेजवर बसवणारा व्यक्ती गेला. अशा व्यक्तीबद्दल बोलण्यासाठी मी उभा आहे हे सांगताना सुध्दा आपल्याला अभिमान वाटतो. आबांच्या सांनिध्यात जी लोक होती त्यांच्यावर नावानिशी प्रेम करणारा हा व्यक्ती होता. या ठिकाणी मी आपणांस सांगतो की, ज्या ज्या वेळी आबा आमच्याकडे ज्या ज्यावेळी आले होते त्या त्यावेळी एक साधा माणूस कशाप्रकारे घरी येतो तशाप्रमाणे त्यांची वागणूक होती. आताच आपल्या वहिनींनी सांगितले की, आबा म्हणजे आमच्या पक्षाचा चेहरा होते. खरंच आबा हे पक्षाचा जीवखडा होता. ज्यावेळी पक्षाची स्थिती नव्याने उभारण्याची होती त्यावेळी ती पक्षाची धुरा त्यांच्याकडे दिली होती. त्यावेळी ते प्रत्येकाच्या घरी गेले होते. ज्यावेळी ते भोईर साहेबांच्या घरी आले होते त्यावेळचे डावखरे साहेब आणि जगदाळे साहेब हे सुध्दा त्यांच्याबरोबर तेंव्हा होते. त्यावेळी त्यांचा एक शब्द होता की, आपल्याला सगळयांना जवळ करुन पक्ष वाढवायचा आहे. या ठिकाणी अजून एक गोष्ट सांगतो माझे लग्न ६ फेब्रुवारीला झाले आणि ९ फेब्रुवारीला पक्षाची स्थापना झाली. राजकारणातील व्यक्ती कशी असावी ते त्यांच्याकडून शिकावे असे वाटते. मी या ठिकाणी जास्त काही बोलू इच्छित नाही. जो सर्वांत जवळचा हवा-हवासा वाटणारा होता तो आपल्यापासून आज दूर गेलेला आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

**श्री. संजय वाघुले :-**

महापौर महोदय, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आर.आर.पाटील यांचे नुकतेच सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले आणि सांगली जिल्हयातील अंजनी हया गावावर शोककळा पसरली. राष्टीवादीचा एक आदर्श नेता, महाराष्ट्राचा आदर्श नेता, कुठलाही राजकिय वारसा नसताना जिल्हा परिषद सदस्य ते उप मुख्यमंत्री, गृहमंत्री असा प्रवास हया व्यक्तीने केला होता. त्यांच्याबाबतीत दोन तीन उदाहरण हया ठिकाणी दयावीशी वाटतात. कॉलेजमधील युवक वर्ग असेल किंवा युवा पिढी जी लेडीजबारच्या नादाला लागली होती. त्यावेळी अतिशय मोठा डान्सबार बंदीचा निर्णय या नेत्याने घेतला. हा निर्णय घेत असताना समोर जे धनदांड व्यापारी होते, हॉटेल व्यवसायिक होते असे असतानाही त्यांनी एक चांगला निर्णय त्यावेळी आबांनी घेतला. त्यावेळी अतिशय मोठया प्रमाणांत महिला वर्गाती आबांना शुभेच्छा दिल्या. असा हा नेता होता हया नेत्याच्या जाण्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मोठया प्रमाणांत नुकसान झालेले आहे. हया नेत्याचे निधन झाल्यानंतर महाराष्ट्रातील जे सामाजिक क्षेत्रात काम करणा-या ज्या व्यक्ती आहेत मग त्यामध्ये प्रकाश आमटे असतील, डॉ.तात्यासाहेब लहाने असतील किंवा अण्णा हजारे असतील अशा नेत्यांच्या ज्यावेळेला प्रतिक्रिया वृत्तपत्राच्या माध्यमातून किंवा टी.व्ही.च्या माध्यमातून जनतेसमोर आल्यानंतर हा नेता काय होता हे महाराष्ट्रातील जनतेला कळाले. शेवटी व्यक्ती गेल्यांनतर त्याचे गुणगान गायिले जातात परंतू राष्ट्रवादीचा आदर्श नेता आपल्यामधून निघून गेल्यामुळे महाराष्ट्रावर मोठी शोककळा पसरली आहे. मी भारतीय जनता पार्टीच्या वतीने, माझ्या कुटूंबाच्या वतीने आबांना या ठिकाणी भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो. ओम शांती.

**श्रीम. प्रमिला केणी :-**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्य मंत्री, माजी गृहमंत्री रावसाहेब रामराव पाटील उर्फ आर.आर.पाटील यांचा जन्म तासगांव तालुक्यातील अंजनी हया गांवी झाला. आज ते गेल्यामुळे आपल्यात एक पोकळी निर्माण झालेली आहे. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असलेले आबा आज आपल्यात नाहीत. २००४ साली गृहमंत्री म्हणून कॅबिनेट मंत्रीपदाची महत्वाची जबाबदारी मा. शरद पवार साहेबांनी त्यांच्यावर सोपवली. ती जबाबदारी त्यांनी विश्वासाने सार्थ करण्याचा प्रयत्न केला. त्याकाळात डान्सबारचे मोठे स्त्रोत माजलेले होते. त्यामुळे तरुणाई वाम मार्गाकडे वळू लागली होती. त्यामुळे डान्सबारच्या व्यावसायिक स्पर्धेतून खून-मारामा-या, गॅंगवारचे प्रमाण वाढले होते. एक पिढी बरबादीपासून वाचवून त्यांनी एवढा मोठा विरोध झुगारुन त्यांनी डान्सबार बंदी केली आणि कित्येकांचे संसार वाचवले. असे आबा

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

आज आपल्याल नाहीत आणि ही पोकळी भरुन न येणारी आहे. त्यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना.

**श्रीम. आशा कांबळे :-**

महाराष्ट्र राज्याचे माजी गृहराज्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, आर.आर.पाटील आज आपल्यात नाहीत. १६ फेब्रुवारीला त्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. जीव हा नाशिवंत आहे. कधी ना कधी त्याचा अंत हा होतच असतो. परंतू माणूस जीवंत असताना किती जगला त्यापेक्षा तो कसा जगला हे महत्वाचे असते. त्यांचेप्रमाणे आपले आबा जरी आपल्यामध्ये देहाने नसले तरी स्मृतीने ते कायमचे आपल्यामध्ये असणार आहेत. त्यांचा देह जरी अंतनात विलीन झाला तरी त्यांचे आदर्श, त्यांचे विचार हे न संपणारे आहेत. मला आठवतंय त्यांच्या भाषणामधून मी टी.व्ही.वर ऐकले होते की, वयाच्या २२ व्यावर्षी त्यांनी पहिल्यांदा पायामध्ये चप्पल घतली होती आणि ती सुध्दा स्लिपर होती. आज माणसाला थोडेसे जरी वैभव प्राप्त झाले तरी माणूस कुठल्या कुठे पोहचतो. परंतू आबा त्यांच्या पहिल्या पायरीपासून ते उपमुख्यमंत्री होईपर्यंत ज्या ज्या पाय-या होत्या त्या टप्प्या टप्याने वर चढत गेले. त्यांचा विकास होत गेला. त्याचा विकास करता करता त्यांनी आपल्य कुटूंबावर स्वतःची जी काही साधी राहणी होतं तेच त्यांची त्यांच्या कुटूंबात असल्याचे आपल्याला दिसलेले आहे. आबांनी त्यांच्या गावाचा विकास केला. आबांचे विचार हे न संपणारे आहेत. आबा आज जरी आपल्यामध्ये नसले तरी ते कायम स्वरुपी आपल्या स्मरणांत राहणार आहेत. आबांना मी माझ्या कांबळे कुटूंबियांतर्फे, ज्या ज्या पक्ष संघटनांशी मी संबंधित आहे अशा सगळयांतर्फे मी भावपूर्ण श्रध्दांजली वाहते. त्याचप्रमाणे आंबेडकरी चळवळीतील आप्पासाहेब इंदिसे हे वरुन जरी फणसासारखे कडक दिसले तरी आतून ते मधून असे होते. प्रत्येकाच्या समस्येला ते धाऊन जात होते. असे आप्पा इंदिसे सुध्दा आज आपल्यात नाहीत. त्यांनी ही मी माझ्या कुटूंबातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली वाहते. जयभिम. जय भारत.

**श्रीम. अनिता बिर्जे :-**

महाराष्ट्राचे माजी उप मुख्यमंत्री, गृहमंत्री, ग्रामविकास मंत्री. आबांचा आणि आमचा जो परिचय असायचा तो संघर्षामधून कारण आम्ही शिवसैनिक आणि आबा राष्ट्रवादीचे त्यामुळे त्या पातळीवरच असायचा. पण तरीही आबांविषयी एक आत्मियता असायची. कारण ज्या वेळेला मंत्री म्हटल्यानंतर सच्चे् मंत्री आबा. कोणताही निर्णय घेताना तो जनतेला विचारुन घेतला जायचा. आज हया ठिकाणी अनेक सदस्यांच्या भावना ऐकल्यानंतर आबांच्या गुणांचे एक होते की, कुणी निंदा, कुणी वंदा आम्हा सोवितांचा धंदा. त्या पध्दतीनेच आबा राजकारण करत होते आणि हे राजकारण बघताना कुठलातरी त्यांच्याकडून एखादा गुण घ्यावा असाच होता. आज मनातून खंत वाटत असताना एकच सांगावेसे वाटतं.

वायु नो झा वा-यासंगे
ओलांडून ही भिंत
अन् आबांना सांगा आमुच्या मनातील खंत
आज रडतो आहे महाराष्ट्र
पुन्हा एकदा जन्म घ्या तुम्ही आपल्या महाराष्ट्रात

एवढे बोलून मी त्यांना माझी श्रध्दांजली अपर्ण करते. जयहिंद, जय महाराष्ट्र.

**श्रीमती मालती पाटील :**

मा. महापौर महोदय, कै. सन्मा. राज्याचे उपमुख्यमंत्री रावसाहेब रामराव पाटील, म्हणजेच आर. आर. पाटील आणि सर्वांच्या ओळखीचा शब्द म्हणजे आबा. आबा या शब्दातच काहीतरी मोठेपण दडलेले आहे. कारण घरातली व्यक्तीलाच तिलाच आपण आबा म्हणतो आणि सगळयाचे लाडके आबा आपल्याला सर्वांना सोडून निघून गेलेले आहेत, त्यांच्याबद्दल बोलायचे म्हणजे शून्यातून मोठे झालेले. गरीबी काय ही त्यांनी जवळून बघितले होते. आबा हे अंजनी गावात एखाद्या गरीब कुटुंबात जन्माला आले

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

होते. श्रीमंती ही त्यांना माहितीच होती. जन्माला आल्यानंतर थोड्याच दिवसांत वडील गेल्यानंतर फाटलेला त्यांचा शर्ट शिवण्यासाठी जेव्हा त्यांनी तो आईजवळ नेला तेव्हा आईला वाटलं हा शर्ट मी कसा शिवू. त्या वेळेला त्यांच्या वडिलांचे जे जुने कपडे होते, त्याचे गाठोडे घेतले आणि ते टेलरकडे घेवून गेले. टेलरनेही त्यांच्याकडे आपुलकीने बघितले या एवढ्या मोठ्या कपडयांचे छोटे कपडे शिवायचे, हे पाहून टेलरच्या डोळ्यात देखील पाणी आले. एखाद्या गरीब घराण्यात जन्माला आलेले आबा फक्त अंजनी जे गाव होतं त्या एका घरातच माहिती होते. ते आबा आहेत, आणि त्यांनाचा फक्त खुशी झाली होती. परंतु आज इतक्या वर्षानंतर आबांचे जे कार्य होते. त्यांचे कार्य इतके महान होते पूर्ण महाराष्ट्राला त्याचे दु:ख झालेले आहे. आबा हे कोण होते हे संपूर्ण जनतेला माहित होते. आज महिलांसाठी सांगेन की लेडीज डान्स बारबाबत बोलायला बरेच जण असतात, परंतु करून दाखवायला कमी व्यक्ती असतात. आणि त्यांनी प्रथम स्त्रियांचा विचार केला आणि स्त्रियांची घरं, ज्या दु:खी स्त्रिया आहेत त्यांचे संसार चांगल्या प्रकारे कसे चालवता येतील, त्यांनी प्रथम आवाज उठवला तो डान्स बार बंद करण्याचा. या सर्व स्त्रियांतर्फे मी सांगेन की, बरेच जण आवाज उठवितात परंतु जे करायचे आहे ते कधीच करत नाही. आबांचे व्यक्तिमत्व, वक्तृत्व बरेच जण जेव्हा भाषणाला उभे राहतात, तेव्हा आमच्यासारख्या जनतेला असं वाटतं ही व्यक्ती आता कधी बसणार, परंतु आबा जेव्हा उभे रहायचे आणि वक्तृत्व करायचे, तेव्हा त्यांचे भाषण ऐकावे असे जनतेला वाटायचे, त्याच्यातून काहीतरी बोध घेण्यासारखा असायचा. त्यांचे प्रथम भाषण टीव्हीवर मी बरेच वेळेला ऐकले होते. ज्यावेळेला मला तिकीट जाहीर झालेले, त्यावेळी लोकसभा होती. या कोपरी विभागात पॅनेलमध्ये राष्ट्रवादी आणि कॉंग्रेस जे पॅनेल होते, त्याच्यासाठी आबा कोपरी गावात आलेले. आबांना बघायला नव्हेतर त्यांचे भाषण ऐकण्यासाठी इतकी गर्दी झालेली. ती गर्दी बघून आम्हाला नक्कीच वाटले की हे पॅनल निवडून येणार आहे. मला असं वाटतं की, आबाचे जे वक्तृत्व होते, त्यांचे जे गुण होते, त्यांची जी गरीबी होती. त्या गरीबीतून ते मोठे झालेले होते. त्यांना मी आणि स्त्रियांसाठी जे केले आहे, त्याचप्रमाणे बऱ्याच स्त्रिया अशा असतात की पोलीस स्टेशनमध्ये गेल्यावर, जेन्टस पोलीसांकडे त्यांचे दु:ख व्यक्त करता येत नाही तर याच्यासाठी आबांनी पोलीस दलांचा महिलांना जास्तीत तिथे सहभाग कसा मिळेल याच्यासाठी त्यांनी आटोकोट प्रयत्न केले होते. अशा आबांना माझ्यातर्फे, माझ्यापक्षातर्फे, माझ्या कुटुंबियांतर्फे श्रध्दांजली वाहते आणि माझे दोन शब्द संपविते. ओम शांती शांती शांती.

**श्रीमती रत्नप्रभा पाटील :**

मा. महापौर महोदय, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आर.आर.पाटील हे आपल्यामध्ये नाहीत याचे संपूर्ण महाराष्ट्राला दु:ख झालेले आहे. तशी मी माझ्या परिवारातर्फे, महाराष्ट्र नवनिर्माण आबांना श्रध्दांजली वाहते. आबा हे नाव २००४ साली सर्वांच्या लक्षात आले,ज्यावेळेला ते महाराष्ट्राचे गृहमंत्री होते. त्यांनी लेडिजबार, डान्सबार बंद करण्यासाठी धाडसी निर्णय घेतला त्यावेळी ते प्रकाश झोतात आले. त्यांनी जेव्हा बार बंद केले, त्यावेळी खूप महिलांना दिलासा मिळाला होता. जे बार बंद झाले, तरूण पिढी, बारमध्ये नृत्य होते त्यावेळी पैसा उधळला जातो. अशा महिला होत्या त्यांना संसाराला सुध्दा पैसा मिळत नव्हता, त्यांचे पती किंवा मुले बार मध्ये जावून पैसा उधळत होते, त्याच्यावर बंदी आली आणि महिलांना दिलासा मिळाला. आबा त्यांचे नाव रावसाहेब असले तरी त्यांची राहणी खूप साधी आणि उच्च विचारसरणी होती, त्यांनी गरीबीतून दिवस काढलेले आहे. जिल्हापरिषदेपासून तर उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री पर्यत त्यांचा प्रवास होतात. त्यांचे जे हलाखीचे दिवस होते आपण जे राजकारणात आहे, किंवा मध्यमवर्गीय उच्चमध्यमवर्गीयांची मुले सुध्दा महानगरपालिकेच्या किंवा जिल्हा परिषदेच्या शाळेत जात नाहीत. पण हे गृहस्थ असे होते उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री असताना सुध्दा त्यांनी त्यांच्या मुलांना मुंबईसारख्या मोठया शहरात आणले नाही, मोठया इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातलेले नाही. ते जसे शिकले तसेच त्यांनी त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय केलेली होती. अशी उच्च विचारसरणीचे त्यांनी दाखवून दिलेली आहे. भपकेबाजपणा किंवा मोठया इंग्रजी शाळेत जावून शिक्षण पूर्ण होते आणि माणूस मोठा नावारुपाला येतो असे काही नाही. गरिबांची मुले आणि नगरपालिकेच्या शाळेतून शिकलेली मुले सुध्दा मोठया पदाला जावू शकतात हे त्यांनी मोठे उदाहरण प्रस्थापित केलेले आहे. आबांनी खूप हलाखीचे दिवस काढलेले आहे. त्यापासून आपण एक शिकू शकतो. भपकेबाजपणाने लोक जगतात, किंवा पैशाचे वेड

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

धरतात. आबांची संत गाडगेबाबा स्वच्छता मोहिम होती, तंटामुक्त ग्राम अभियान त्यांनी राबविले, मला आधी माहित असते तर मी त्यांना पत्र अवश्य लिहिले असते की, महानगरपालिकाही तंटामुक्त करा. कारण मी आज तीनवर्ष होवून गेली तर आपल्या सभागृहात नेहमी तंटेच पाहत आलेली आहे. विकासाचे कामावर आपली कमी चर्चा झाली. तंटयावरच जास्त झाली. ते मला आधी माहित नव्हते. आणि दुर्देवाने ते गेल्यानंतर वर्तमानपत्रातून ही बातमी मला कळली. आबांना मी माझ्या परिवारातर्फे, महाराष्ट्र नवनिर्माण तर्फे श्रध्दांजली वाहते. ईश्वर त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो आणि आबांना चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**श्री. विक्रांत चव्हाण :**

मा. महापौर महोदय, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री गृहमंत्री रावसाहेब रामराव उर्फ आर.आर पाटील साहेब यांचे १६ तारखेला दुःखद निधन झालेले आहे. या ठिकाणी त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी मी पक्षाच्यावतीने गटनेता म्हणून उभा आहे. या सभागृहातील बऱ्याच सदस्यांनी त्यांचे विचार त्यांच्या स्वभावातील गुण आणि महाराष्ट्राला, देशाला त्यांनी दिलेले योगदान या संदर्भात बरीच माहिती सभागृहात दिलेली आहे. ही माहिती तुम्हाआम्हा सर्वांना ज्ञात आहे. मी या ठिकाणी एवढंच सांगेन की माझ्या आयुष्यामध्ये मी काही निवडक मंडळी, मला समजायला लागल्यापासून पाहिली राजकारणामधील. जे राजकारणात उच्चपदावर जावून सुध्दा त्यांची गरीबांशी आणि गरीबीशी एक वेगळ्या प्रकारची नाळ त्यांनी जोपासलेली होती. त्यामध्ये प्रामुख्याने इंदिरा गांधी, राजीवजी गांधी, धर्मवीर आनंद दिघे साहेब आणि आर.आर.पाटील साहेब. त्यामुळे या ठिकाणी एवढंच सांगेन की या शहराचेच नव्हे तर या महाराष्ट्राचेच नव्हे तर या देशाचे फार मोठे नुकसान आर.आर साहेब जाण्याच्या माध्यमाने झालेले आहे. आणि दस्तरखुद्द पंतप्रधानाने बोलून दाखवलेले आहे. राहूलजीनी बोलून दाखविलेले आहे आणि अण्ण हजारेसारख्या स्वातंत्र्यसेनानी प्रकाश आमटेसारख्या मॅगेसेस ॲवार्ड मिळालेल्या समाजसेवकांनी बोलून दाखवलेले आहे. त्यामुळे अशा व्यक्तींनी जी दिशा दाखवण्याचे काम या ठिकाणी महाराष्ट्राला आणि देशाला दिलेले आहे. दाखविलेले आहे, त्याच्यावर केवळ भाष्य न करता आयुक्त महोदय, महापौर महोदय आपण त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न सभागृहाच्यावतीने आणि प्रशासनाच्यावतीने केला पाहिजे. उदा. स्वच्छता अभियान असो, लेडीजबारवरची बंदी असो, हे आपल्या हातातील विषय आहे. तंटामुक्ती हा आपल्या हातातला विषयनाही परंतु लेडिज बार वरची बंदी आणि स्वच्छता अभियान हे आपल्या हातातील विषय आहेत. या ठाणे शहरामध्ये माहितीच्या अधिकारातून मिळालेली माहिती उपायुक्त अतिक्रमण यांनी जी मला दिलेली आहे. स्टॅण्डिंग कमिटीला दिलेले आहे. त्यामध्ये ९९.९९ % लेडीज बार हे अनधिकृत बांधकामामध्ये आहेत. आणि ही अनधिकृत बांधकामे कमर्शियल असल्यामुळे आपण नक्कीच जमीनदोस्त करू शकतो. एकच बार फक्त लेडीज बार हा एका मॉलमध्ये अधिकृत आहे. स्वच्छता अभियान जे आपल्या हातात आहे, ज्याला नरेंद्र मोदी साहेब यांनी सुध्दा पाठिंबा दिलेला आहे. आणि त्यामुळे या दोन गोष्टी जर आपण प्रामुख्याने हाती घेतल्या आणि तडीस नेल्या तर मला वाटतं. आबांना ही खरीखुरी श्रध्दांजली ठाणे शहरातर्फे असेल, आणि त्यामुळे पुन्हा एकदा या सभागृहाच्यावतीने, या शहराच्यावतीने, सर्व पक्षांच्यावतीने, माझ्या पक्षाच्यावतीने, माझ्या कुटुंबियातर्फे, माझ्यातर्फे आबांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करतो. हरिओम.

**श्री. संतोष वडवले :**

मा. महापौर महोदय, महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री, ग्रामविकासमंत्री, गृहमंत्री आर.आर. पाटील उर्फ आबा यांचे १६ तारखेला दुःखद निधन झाले खरोखर एक चांगले व्यक्तिमत्व आज आपल्या महाराष्ट्रातून निघून गेले आहे. महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान झाले आहे. आबांनी खरोखर चांगले उपक्रम राबविले आणि महाराष्ट्रामध्ये त्यांचे नाव एकदम उंच शिखरावर गेले असे आबा ज्यांनी संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, तंटामुक्ती गाव असे अभियान राबवून आज आपले नाव लौकिक केले. आणि विशेषतः म्हणजे जे डान्सबार होते त्याला बंदी आणली. माणसाने मरावे परी किर्ती रूपी उरावे असे हे आबा आपल्यातून निघून गेले आहेत. मी ज्यावेळेस रायगडला लग्नाला गेलो होते. त्यावेळी घरामध्ये बसल्यावर आम्ही बघितले एका महिलेने आबांचा फोटो देव्हाऱ्यावर ठेवून त्यांची पूजा करत होती म्हणजे आबांची

-महापौर

किती प्रचिती होती याच्यावरून दिसून येते असे थोर नेते आज आपल्या महाराष्ट्रातून निघून गेले आहेत, त्यांच्या जाण्याने जे महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे. हे दुःख पेलविण्याची शक्ती देवो, आमच्या हिंदूच्यावतीने मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा. विरोधी पक्ष नेते :**

मा. महापौर महोदय, एका थोर नेत्याची श्रध्दांजली वाहण्याची या सभागृहामध्ये वेळ येईल आणि एवढया लवकर येईल असे वाटत नव्हते. स्थायीसमितीची सभा ज्यादिवशी होती त्या दिवशी दुपारीच काही मंडळीकडून निरोप आलेले की, आबांची तब्बेत अतिशय अत्यवस्थ अशा परिस्थितीमध्ये आहे. मी सातत्याने त्याच्या नातेवाईकांशी संपर्कात होतो, परंतु असे समजत होते की, पांढ-या पेशी वाढतं आहे त्याच्या तब्बेतीमध्ये सुधारणा होते अशा प्रकारचे चित्र बारा-एक वाजेपर्यंत होते. सन्मा. सभागृह नेते त्यांनी सुध्दा त्यांच्याकडे निरोप आल्यानंतर मला म्हटले की, अशा प्रकारचे निरोप आलेत काय परिस्थिती आहे. परंतु, परिस्थिती भयानक आहे अशा प्रकारचे चित्र नाही असे फोनवरुन मला कळत होते. परंतु स्थायी समितीची सभा सुरू झाली आणि अचानकपणे निरोप आला की आबा आपल्याला सोडून गेले.

महापौर महोदय, या सभागृहामध्ये दोन अडीच तास बऱ्याच मंडळींनी आबांच्या बाबतीतली भूमिका मांडली. आपण सर्वांनी ऐकली. खरोखर तो क्षण ज्यावेळी निरोप आला त्यावेळेला अतिशय भयानक असे म्हणजे काही घडते आणि काय घडलं आहे आणि हे कसं घडू शकतो अशा प्रकारचे वातावरण सभागृहामध्ये झाले. मी आणि सन्मा. सदस्य नजीब मुल्ला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये रवाना झालो. त्या ठिकाणी पाहिल्यानंतर आमच्या सर्वांच्या पायाखालची वाळू सरकलेली बघायला मिळाली. त्यानंतर आम्ही त्यांच्या सांगली या गावी गेलो. एक संवेदनशील राजकारणातला माणूस म्हणून सभागृह नेत्यांना धन्यवाद देईन. त्यांनी स्वतःहून मला दूरध्वनी केला आणि आपण जर आबांकडे जाणार असाल, तर मी स्वतः यायला तयार आहे अशा प्रकारचे मत व्यक्त केले. राजकारण आणि समाजकारणामध्ये आपण वावरत असताना ज्या माणसांनी आपल्या जिल्ह्यासाठी, राज्यासाठी, देशासाठी काही केलेले असते याची जाणीव समाजकारणी म्हणून असायला पाहिजे आणि ती सभागृहनेत्याच्या रुपाने त्या दिवशी मला दिसली. मी सभागृहनेते आणि नारायणपवारसाहेब तिघे अंजनी गावामध्ये गेलो. तिथली परिस्थिती पाहिली एक गरीब कुटुंबातून मोठा झालेला नेता आर.आर.पाटलांना आबांना म्हटले जाते. परंतु आबा कार्यकर्त्यांच्या रुपामध्ये बघायला या महाराष्ट्राला मिळालेले आहेत. अतिशय साधी राहणी, उच्च विचारसरणी सर्व समाजाला बरोबर घेवून जाण्याचे काम आबांनी आपल्या पूर्ण आयुष्यामध्ये केले. वयाच्या २०,२२ वर्षापासून जिल्हापरिषदेवर काम करण्याची ग्रामीण भागामध्ये त्यांना संधी मिळाली. ग्रामीण भागामध्ये जिल्हापरिषद पंचायतसमितीच्या माध्यमातून जो कार्यकर्ता तयार होतो त्याला एक वेगळे प्रकारचे भविष्य असते. कारण गोरगरीब जनतेची सेवा करण्याची संधी त्या ग्रामीण भागामध्ये मिळते. आबा ज्या भागातून जिल्हापरिषदेवर आले त्या काळामध्ये तो दुष्काळी भाग होता. शेतकऱ्यांच्या फार अडचणी होत्या. या सगळयांचा विचार करून गेली ११ वर्षे १९७९ ते ९० आबांनी जिल्हापरिषदेमध्ये सदस्य म्हणून काम केले आणि त्या काळामध्ये चांगल्या प्रकारचे समाजसेवक म्हणून त्यांनी स्वतःची ख्याती निर्माण केली.

महापौर महोदय, महाराष्ट्रामध्ये बरेचशे नेते आपल्याला बघायला मिळाले असतील. गेल्या काही वर्षामध्ये सोडून गेलेले नेते, ज्यामध्ये आदरणीय बाळासाहेबांचा उल्लेख करावा लागेल. विलासरावजी देशमुख यांचा उल्लेख करावा लागेल. समाजातले नेते, समाजाभिमुख नेते, समाजाचे प्रश्न सोडविण्याची भूमिका घेवून समाजामध्ये जे काम केलेले नेतेमंडळी आज आपल्यातून गेलेली आहेत. राजकारणात आणि समाजकारणामधील नेतेमंडळी गेल्यानंतर नुकसान काय होते हे निश्चितच आपल्या सर्वांना माहित असेल. मी स्वतः आदरणीय स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचा कार्यकर्ता म्हणून १९७२-७३-७४ च्या दरम्यान काम केल्यानंतर त्यावेळेला यशवंतराव चव्हाण साहेबांचे जे विचार होते, एक व्यक्ती गेल्याने काय होते त्याची किती पोकळी निर्माण होते आपण श्रध्दांजलीच्या भाषणांत सातत्याने बोलत असतो. ही पोकळी निर्माण झाली आणि ती आपण भरुन काढू शकत नाही

महापौर महोदय, दिघे साहेबांची पोकळी ठाणे शहरामध्ये आज भरून निघालेली आपल्याला बघायला मिळत नाही. सर्वांना घेवून जाणारा जो नेता असतो ती पोकळी असते तो माणूस गेला त्याचे विचार गेले. विचार गेल्यानंतर त्याच्या पाठीमागे काही राहत नाही. बऱ्याचवेळेला अशा प्रकारचे नेते मंडळी

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

आपल्याला सोडून गेल्यानंतर खरं म्हणजे एक वेगळया प्रकारचे चित्र समाजामध्ये निर्माण होते. कारण काही जी माणसे असतात त्यांनी समाजासाठी जन्म घेतला आहे अशाप्रकारची ज्यांची ख्याती असते, समाज आणि समाज अशाप्रकारचे त्यांचे काम असते.

महापौर महोदय आबांच्याबाबतीत बोलायचे झाले तर आबा जिल्हापरिषद सदस्य होते, राज्याचे ग्रामविकास मंत्री होते, राज्याचे गृहमंत्री होते, एवढ्या मोठ्या पदावर राज्याचे उपमुख्यमंत्री होते. पण एवढं सगळं करत असताना स्वतःच्या कुटुंबाला या पदांपासून सातत्याने लांब ठेवण्याचे काम करणारा एकमेव नेता जर कोण असेल तर त्यांचे नाव इतिहासामध्ये राहील जे फक्त आबा आणि आबा.

महापौर महोदय, आपल्याला माहित असेल, आबांची मुले जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये १० व ११ वी पर्यंत शिकत होती. त्या कुटुंबामध्ये सत्तेचा लवलेष नव्हता. मधल्या काळामध्ये काही त्यांच्या स्टेंटमेंटमुळे त्यांना राजीनामा देण्याची वेळ आली होती. राजीनामा दिल्यानंतर आबा एक इनोव्हा गाडी, एक ड्रायव्हर घेवून त्यांच्या मूळ गावी गेले होते. अतिशय साध्या स्वरूपामध्ये. स्टेटमेंट करताना त्यांचा उद्देश तसा नव्हता. परंतु उद्देश तसा नसताना सुध्दा त्यांच्यावर ती वेळ आली. दुसऱ्या दिवशी सकाळी मी आणि आताचे आमदार सुभाष भोईर साहेब दोघे अंजनी या गावी गेलो. गावी गेल्यानंतर आम्ही पाहिले आबांचे घर आणि आबांची माणसातली श्रीमंती या दोन गोष्टी पाहिल्या. खरोखर आम्ही चकित झाली. बसायला सतरंजी टाकलेली होती आणि त्या सतरंजीवर ग्रामस्थ मंडळी बसलेली होती. ते पाहून खरोखर आम्ही चक्रावून गेलो. शहरी भागामध्ये आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून काम करतो, ग्रामीण भागामध्ये लोकप्रतिनिधी काम करताना आणि एवढं नावलौकिक कमावताना त्याच्यामध्ये असणारा समाजसेवक असणे गरजेचे आहे. तो आम्हाला समाजसेवक दिसला. मी जास्त वेळ घेणार नाही. बऱ्याच वक्त्यांनी आबांच्या स्वभावाबाबत चर्चा केली पण ग्रामविकास खात्यामध्ये त्यांनी जे स्वच्छता अभियान राबविले. आदरणीय भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या आदेशाने स्वच्छता अभियान राबवतो ते गाडगेबाबा अभियान आबांनी त्यावेळी तयार केले. त्यावेळी स्वच्छता अभियान जनक कोण असतील तर ते आबा आहे हे तुम्हाला आम्हाला टाळता येणार नाही.

महापौर महोदय, ग्रामविकास खात्यात काम करत असताना अतिशय साधेपणाने सर्व ग्रामीण भगातल्या प्रश्न सोडविण्याची भूमिका त्यांनी घेतलेली होती ती अतिशय कौतुकास्पद होती. सावकारांचा प्रश्न त्यांनी गृहमंत्री असताना घेतलेला असेल. बऱ्याच अंशी मराठवाडा पश्चिम महाराष्ट्रामध्ये आणि विदर्भामध्ये सावकारांचा फार मोठा प्रश्न होता. सावकारी पेशामध्ये गोरगरीब माणूस गुरफटला जातो. शेतकरी आत्महत्या करत होते आणि सावकारी पैशातून १० टक्के, ५ टक्के, ७ टक्के व्याजांनी कर्ज काढून शेतकरी कुटुंबातला माणूस घरामधील काम करत असतो. लग्न करत असतो. किंवा कुठल्या हॉस्पिटलचा खर्च करत असतो त्यावेळेला त्याची होणारी पिळवूणक असते, त्या पिळवणूकीतून सोडविण्याचे काम आबांनी केले. माझ्या सहकारी नगरसेविका या ठिकाणी अपर्णा साळवींनी सांगितले की लेडिजबारचा जो मुद्दा आहे. त्यामुळे कितीतरी कुटुंबे सुखावलेली आहे. कितीतरी बंद चुली चालू झालेल्या आहेत. एवढा मोठा धाडसी निर्णय घेत असताना त्यांची टिंगलटवाळी या पुरोगामी राज्यामध्ये सुध्दा झाली. झाली नाही अशा प्रकारचे मत नाही. परंतु माझे स्वतःचे विचार आहेत. विचारापासून लांब जाणार नाही. ज्यावेळेला राजकारणी माणसाला, समाजकारणी माणसाला स्वतःची वैचारिक बैठक असते तर तो एखादा निर्णय घेवू शकतो. कुठल्यातरी चर्चेतून निर्णय घेण्यापेक्षा स्वतःची सामाजिक बांधीलकी, समाजाचे भान लक्षात ठेवून एवढा मोठा निर्णय घेण्याचे काम आबांनी केलेले आहे. आबांचे कार्य जर तसे पाहिले तर निश्चितच अतिशय फार मोठे असे कार्य आबांनी राज्यासमोर ठेवलेले आहे. आपल्याला माहित असेल.

महापौर महोदय, आबांचे शेवटचे भाषण या सभागृहातले माजी सभागृहनेते, आजचे ठाण्याचे पालकमंत्री एकनाथजी शिंदेसाहेब विरोधी पक्षनेते झाल्यानंतर आबांनी जे भाषण केले त्या सभागृहामध्ये जे भाषण केले ते निश्चितच इतिहासामध्ये आणि विधानसभेच्या भाषणांमध्ये त्याची नोंद होईल अशा प्रकारचे भाषण त्यावेळी आबांनी केले. दुसऱ्याचदिवशी दवाखान्यामध्ये ॲडमिट व्हावे लागले. विरोधी पक्षात किंवा सत्ताधारी पक्षामध्ये काम करत असताना फक्त समाजाचे प्रश्न सोडविण्याची भूमिका घेणारा नेता जर कोण असेल तर ते आबा अशा प्रकारचे मत तुमचे आणि आमचे असले तर कुठल्याप्रकारचे गैर होणार नाही.

महापौर महोदय, आबांनी त्यांच्या काळामध्ये गृहमंत्री असताना जी जी कामे केली ती कौतुकास्पद आहे, त्याच्याबद्दल कुठल्याच प्रकारचा वाद नाही. पण त्या कामाबरोबरच आबांनी सातत्याने समाजाचे

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे

आठवतात की, असा मोठा नेता आपल्यासाठी आपल्याला फोनकरून बोलतो हे आपले भाग्य आहे. परंतु तो मोठेपणा आबांचा होता, आमचा नव्हता. त्यांच्या अंत्यविधीला उपस्थित आम्ही राहिलो होतो. ठाणे महापालिकेतून विरोधी हणमंत जगदाळे होते, नारायण पवार होते. ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब होते. त्यावेळी आबांसाठी जी जनता जमली होती दोन अडीच किलोमीटरच्यावरती गाड्या पार्किंगची व्यवस्था होती. पण लोकांची मुंगीसारखी रीघ लागली होती. सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातील हा तरूण हा त्या ठिकाणचा कार्यकर्ता, शेतकरी आज मंत्री झाला आणि ९० पासून सुध्दा ते का निवडून येत आहेत? त्या वस्तीत, गावात गेल्यानंतर कळले. अतिशय सुजलाम सुफलाम ते गाव तयार झाले होते. त्या गावासाठी त्यांनी विकास केला होता. आजूबाजूच्या प्रचंड खेड्यातील त्या ठिकाणी अनेकजण आम्हाला भेटले. पुण्यातले, अमरावतीतले भेटले. शिवसेनेच्या कामानिमित्त महाराष्ट्रात फिरत असताना अनेकजणांच्या ओळखी होतात. शिवसैनिक भेटले, ते म्हणाले तुम्ही इथे आलात. आम्हाला आबांबद्दल रिस्पेक्ट आहे, म्हणून आलो. आबांना आम्ही मानायचो म्हणून आम्ही आलो असा हा अजातशत्रू त्या दिवशी त्यांचे निधन झाले. सगळ्यांनी आबांची कारकीर्द सर्व सदस्यांनी मांडलेली आहे. मी जास्त काही भाषण न करता त्यांना काव्यमय श्रध्दांजली देण्याचा प्रयत्न करतो आहे.

कोपरखळ्या मारत गाजवायच्यात सभा
कोपरखळ्या मारत गाजवायच्यात सभा
तुमचे भाषण ऐकायला उत्सुक होता महाराष्ट्र उभा
तुमचे भाषण ऐकायला उत्सुक होता महाराष्ट्र उभा
पण अर्ध्यावरती डाव सोडून निघून गेलात आबा
तुमच्या एका निर्णयाने, पेटल्या घरोघरी चुली
तुमच्या एका निर्णयाने, पेटल्या घरोघरी चुली
बारमध्ये नाचायच्या बंद झाल्या मुली.
बारमध्ये नाचायच्या बंद झाल्या मुली
या तुमच्या निर्णयाने सावरले संसार
या तुमच्या निर्णयाने सावरले संसार
अन् उगवली मंगलप्रभात,
अन् उगवली मंगलप्रभात
अर्ध्यावरती डाव सोडून निघून गेलात आबा
हाती घेतले तुम्ही स्वच्छतेचे व्रत
हाती घेतले तुम्ही स्वच्छतेचे व्रत
गाडगेबाबांच्या विचारावर वाटचाल करत
गाडगेबाबांच्या विचारांवर वाटचाल करत
फक्त बोलण्यापेक्षा कृती करत
फक्त बोलण्यापेक्षा कृती करत
प्रत्येकाच्या मनावर घेतला तुम्ही ताबा
अर्ध्यावरती डाव सोडून निघून गेलात आबा
तुमच्या रुपाने आदर्श मिळाला
तुमच्या रुपाने आदर्श मिळाला
शेतकऱ्यांच्या पोरांना
भुलला नाहीत तुम्ही पदे आणि प्रलोभनांना
भुलला नाहीत तुम्ही पदे आणि प्रलोभनांना
त्याचीच पावती म्हणून, त्याचीच पावती म्हणून
हात जोडून आज सारा महाराष्ट्र उभा
अर्ध्यावरती डाव सोडून निघून गेलात आबा

अशा या महाराष्ट्राच्या जिंदादिल नेत्याला ठाणे महापालिकेतील सर्व नगरसेवकांतर्फे, माझ्या कुटुंबियातर्फे, आणि शिवसेना पक्षातर्फे आदर्श नेत्याला माझी भावपूर्ण श्रध्दांजली. त्याचबरोबर

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

ठाणेकरांतर्फे मनपूर्वक श्रध्दांजली आणि ठाण्यातील आरपीआयचे ज्येष्ठ नेते अप्पा इंदिसे यांचे नुकतेच निधन झाले. अप्पा सुध्दा अतिशय चांगला आंबेडकरी चळवळीमध्ये काम करायचे मी तुम्हाला सांगेन की कधीही शक्य नव्हती अशी शिवशक्ती आणि भीमशक्ती युती मागच्या बोर्डात अप्पा इंदिसे यांच्यामुळे या ठाणे महानगरपालिकेला बघायला मिळाली माझ्यावरती अगदी मुलांसारखे प्रेम त्यांनी केले अतिशय शिवसेनेच्या जवळ नेण्याकरिता आम्ही जी काही मंडळी त्यात अग्रणी होते अशा अप्पा इंदिसे यांना सुध्दा माझी भावपूर्ण श्रध्दांजली. आणि जगदाळे साहेबांनी जी सूचना केली आहे. गुटखाबंदी आणि तंबाखूबंदी त्याचबरोबर डान्सबार बंदी ही तर ठाणेमहानगरपालिका करणारच यामध्ये कुठल्याही प्रकारची शंका नाही. परंतु गुटखा, तंबाखू बंदी या संबंधी कायदेशीर सर्व बाबी तपासून आपण निर्णय घेवूया आणि हीच खरी श्रध्दांजली आबांना वाहूया आणि ही सभा पूर्णवेळसाठी तहकूब करावी.

**मा. महापौर :**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आणि ग्रामविकासमंत्री सन्मा. आबा. आत्ताच जवळ अडीच ते तीन तास सभागृहात सर्व सन्मा. सदस्यांनी आबांबद्दल बोलले. खूप काही बोलण्यासारखे आहे, परंतु त्यांचे जे काही अनुभव ते त्यांनी सर्व मांडले. गेले तीन चार दिवस सर्व माध्यमातून आबांबद्दल ज्यांना त्यांचा सहवास लाभला नाही, परंतु ज्यांना लाभला त्यांचे जे अनुभव जे आपण ऐकले. त्यावरून आबा ही व्यक्तीमत्व कसे होते हे सगळ्यांना माहिती झालेले आहे. आबा एक साधं आणि सोप्प असं व्यक्तिमत्व होते. मला जो त्यांचा सहवास लाभला तो एक प्रसंग सांगतो. आमचे एक गणेशोत्सव मंडळ आहे. खरंतर ते शिवसेनेपासून आम्ही त्याचे काम करतो. आबा उपमुख्यमंत्री होते. प्रोटोकॉलप्रमाणे खरेतर त्यांचा एक कार्यक्रम असतो त्याच्याव्यतिरिक्त कुठले कार्यक्रम शक्यतो घेत नाही. यंत्रणा तसे करु देत नाही. त्यावेळी जगदाळेसाहेब, नजीबमुल्ला होते. आमंत्रण नसताना सुध्दा आबा तिथे थांबले, त्यांनी दर्शन घेतले. मी इथे स्टेजवर नाही, परंतु मी येथे आलो आहे, तुमचा सत्कार स्विकारते. उपमुख्यमंत्री असताना सुध्दा त्यांनी रस्त्यावर आमचा सत्कार स्विकारला. खरा कार्यकर्ता आम्ही आहोत आणि कार्यकर्त्यांचा मान त्यांनी ठेवला. आम्ही कुठल्या पक्षाचे आहोत, काही न विचारता त्यांनी आमचा मान ठेवला. सगळे लोकनेता म्हणतात, किंवा त्या संबंधित पक्षातला कार्यकर्ता नेता. परंतु सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांना आदर्श वाटणारी ही जी व्यक्ती होती. लोकनेते खूप होवून गेले परंतु कार्यकर्त्याचा नेता म्हणून ही व्यक्ती होती. त्यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो असे आपण बोलू पण मी तर म्हणेन ही मागणी करेन या हिंदुस्थानामध्ये सर्वपक्षांमध्ये असा कार्यकर्ता प्रत्येक मिनिटाला जन्माला यावा खरं तर या शहराचे या देशाचे भले होईल, आणि असा आदर्श व्यक्तिमत्व आपल्यातून गेले. कार्यकर्त्यांचा एक आदर्श आपल्यातून गेलेला आहे. या व्यक्तिमत्वाला माझ्यातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली. महापौर नात्याने ठाणेकरांतर्फे श्रध्दांजली.

त्याचबरोबर आपल्या ठाण्यातले अप्पासाहेब इंदिसे यांचेही नुकतेच निधन झाले आहे.त्यांनाही भावूपर्ण श्रध्दांजली आणि सन्मा. विरोधी पक्ष नेते, सभागृह नेते यांनी जी तहकूबी मांडलेली आहे, या तहकूबीला मी मान्यता देवून सदर सभा पूर्णवेळ तहकूब करतो. आपण दोन मिनिटे उभे राहून या दोन्ही नेत्यांना श्रध्दांजली वाहू.

-महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

२५

**-: दुखवटा ठराव :-**

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक २५४ दिनांक २०/०२/२०१५**

**ठ रा व :-**

राज्याचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते आर.आर.पाटील यांचे निधन दि.१६ फेब्रुवारी २०१५ रोजी झाले असून, निधनसमयी त्यांचे वय ५७ वर्षे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी, मुलगा व भाऊ असा परिवार आहे.

रावसाहेब रामराव पाटील म्हणजेच आर.आर.पाटील यांचा जन्म १६ ऑगस्ट १९५७ साली सांगली जिल्हयातील तासगांव तालुक्यात असलेल्या अंजनी गावात झाला. आबांनी कमवा आणि शिका हा मंत्र जपत श्रमदान करत शिक्षण घेतले. आरा.आर.पाटील यांना सर्व लोक आबा म्हणून ओळखतात. त्यांची महाराष्ट्रातील प्रसिध्द राजकारणी अशी ओळख होती.

आर.आर.पाटील हे एक उत्कृष्ट वक्ता आणि संसदपटू असल्याने त्यांची राजकिय कारकिर्द अतिशय उल्लेखनीय अशीच होती. सन १९७९ मध्ये सर्वप्रथत त्यांची जिल्हा परिषद सदस्य पदी निवड

झाली. त्यानंतर १९६० साली तारगांवचे आमदार म्हणून त्यांनी निवड झाली. सन १९९० ते २०१४ या कालावधीत सलग ६ वेळा ते आमदार होते. सन १९९६ साली त्यांची काँग्रेसचे विधनसभा प्रतोद म्हणून नियुक्ती झाली. सन १९९८ साली ते विधानसभा लोकलेखा समितीचे अध्यक्ष भुषविल्यानंतर सन १९९९ साली ते ग्रामविकास मंत्री झाले. सन २००४ साली गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदी विराजमान झाले आणि या कालावधीत त्यांनी डान्सबार बंदीचा धाडसी निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. त्याबरोबर संत गाडबेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयाचे पालकत्व स्विकारुन विकासकामांना चालना दिली.

आर.आर.पाटील यांनी त्यांच्या उत्कृष्ट वकृत्वशैलीने राजकीय कार्रकिदीत एक संवेदनशील राजकिय नेता अशी ओळख निर्माण करुन दिली होती. त्यामुळे एक जनसामान्यांचा नेता गमावला आहे अशी सर्व स्तरातून हळहळ व्यक्त होत आहे.

महाराष्ट्राच्या या लाडक्या व्यक्तीमत्वाला ही सर्वसाधारण सभा भावपूर्ण श्रध्दांजली वाहत असून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

**सुचक :- श्री. हणमंत ज्ञानू जगदाळे** **अनुमोदक :-श्री. नरेश गणपत म्हस्के**

**सही/-**
**श्री. संजय भाऊराव मोरे**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिक, ठाणे.**

-महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.

२६

-: दुखवटा ठराव :-

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक २५५ दिनांक २०/०२/२०१५

ठ रा व :-

रिपब्लिकन पक्ष एकतावादी गटाचे ज्येष्ठ नेते श्री. जगदिश दोधा इंदिसे उर्फ आप्पासाहेब इंदिसे यांचे मंगळवार दि. १७/०२/२०१५ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ ,पत्नी, मुले, मुली, सुना-नातवंडे असा परिवार आहे. रिपब्लिकन पक्ष एकतावादी गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष गंगाराम इंदिसे यांचे ते ज्येष्ठ बंधू होते.

मुळचे नंदुरबारचे आप्पासाहेब इंदिसे हे सन १९६० मध्ये ठाण्यात आले. ठाण्यामध्ये आंबेडकरी चळवळ रुजवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. आप्पासाहेब इंदिसे यांनी परेरानगर भागातील गरीब मुलांची शिक्षणाची सोय व्हावी या उद्दात हेतूने एका शिक्षण संस्थेचीही उभारणी केली होती.

कै. श्री. जगदीश दोधा इंदिसे यांच्या निधनाने त्यांच्या कुटूंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. हे दु:ख त्यांच्या कुटूंबियांना सहन करण्याची ताकद परमेश्वर त्यांना देवा व कै. श्री. जगदीश दोधा इंदिसे यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्गती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन ही सर्वसाधारण सभा त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहे.

**सुचक :- श्री. हणमंत ज्ञानू जगदाळे** **अनुमोदक :-श्री. नरेश गणपत म्हस्के**

**सही/-**
**श्री. संजय भाऊराव मोरे**
**महापौर,**
**ठाणे महानगरपालिक, ठाणे.**

**(तद्नंतर श्रध्दांजली वाहून दुपारी २ वाजून १० मिनिटांनी मा. महापौर महोदय, सभा तहकूब केल्याचे घोषित करतात.)**

**(मनिष जोशी )**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सभा तहकूब केल्याची वेळ दुपारी ०२.१० वा.**
**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक :- २०/०२//२०१५**

**सही/-**
**(श्री. संजय भाऊराव मोरे)**
**महापौर,**
**ठाणे महाागरपालिका, ठाणे.**

दि ०१५-६-२०१५ रोजीच्या मा. सर्वसाधारण सभेत सदरचे इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

महापौर
ठाणे महानगरपालिका ठाणे.